रायगड, गुरुवार, दि. १४ नोव्हेंबर २०२४

कृषीवल

किंमत ४ ₹

राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडक कारवाई

रायगड : विधानसभा निवडणूक सन २०२४ च्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाल्यापासून दि.१५ ऑक्टोबर ते दि. १२ नोव्हेंबरपर्यंत एकूण ३२४ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. २४० आरोपींना अटक करण्यात आली आहे. संपूर्ण कारवाईमध्ये एक लाख ५८ हजार ५३१ लीटर दारु जप्त करण्यात आली असून, एकूण जप्त मुद्देमालाची किंमत एक कोटी एक लाख ९० हजार ४९७ आहे. विधानसभा निवडणूक-२०२४ आचारसंहिता कालावधीत या विभागाची सात पथके तैनात करण्यात आली आहेत. पथकांकडून आंतरराजीय मद्य तस्करी होणार नाही, याची दक्षता घेण्यात येत आहे. जिल्ह्यात बेकायदेशीर हातभट्टी दारु निर्मिती व विक्री •➤ पान ५ वर

रोह्यात दोन तरुणी बेपत्ता

रोहा : रोहा तालुक्यातील चणेरा विभागातील तलवडे व चणेरा गावातून दोन तरुणी बेपत्ता झाल्याची घटना नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात घडली असून, या बेपत्ता तरुणी अद्याप घरी न परतल्याने घरातील मंडळींनी रोहा पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली आहे.पूर्वा शैलेश साळवी (२०, रा. चणेरा, ता. रोहा) ही तरुणी १ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास चणेरा गावातून मुरुड येथे राहणाऱ्या मामाच्या गावाला जाते असे सांगून घरातून निघून गेली आहे. ती अद्याप मामाच्या घरी पोहोचली नाही. याविषयी तरुणीची आई •➤ पान ५ वर

आमदाराचा निष्क्रिय विकास

जनतेच्या पदरी वनवास

। रोहा । वार्ताहर ।

मागील निवडणुकीत मतदारांच्या मनात संभ्रम निर्माण करून खोटी आश्वासने देऊन त्यांनी आमदारकी मिळवली. मात्र, निवडून आल्यानंतर आमदारांनी जनतेला वाऱ्यावर सोडले. निष्क्रीय आमदारांमुळे जनतेच्या पदरी वनवास आला आहे, असे टीकास्त्र चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी सोडले.

रोहा तालुक्यातील आरे गावात मंगळवारी (दि. १२) रोजी महाविकास आघाडीच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या प्रचारार्थ कॉर्नर सभेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी त्या बोलत होत्या.

आमदार खोक्यांसाठी गुवाहाटीला तर इथले उद्योग गुजरातला गेले. त्यामुळे तरुण बेरोजगारांची संख्या कैक पटीने वाढली. स्वतः आमदार त्याचप्रमाणे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि सत्ता असताना या भागातील पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्याची आमदारांनी कार्यतत्परता दाखवली नाही. या भागातील लोकांचे पाण्यावाचून हाल होत आहेत. लाडक्या बहिणींना हंडाभर पाण्यासाठी दाही दिशा भटकंती करावी लागत आहे. अनेक लोकोपयोगी कामे प्रलंबित आहेत. अशा निष्क्रिय आणि अकार्यक्षम आमदारांमुळे अलिबाग-मुरुड आणि रोहा तालुक्यातील जनतेने पाच वर्षे अक्षरशः वनवास भोगलाय, अशा शब्दात महाविकास आघाडीच्या उमेदवार चित्रलेखा पाटील यांनी हल्लाबोल करत आ. महेंद्र दळवी यांचा समाचार घेतला. या वनवासातून मुक्ती मिळविण्यासाठी व मला विधानसभेत पाठवून आपली सेवा करण्याची संधी द्यावी, असे आवाहन चित्रलेखा पाटील यांनी केले. •➤ पान ५ वर

पाण्यासाठी लाडक्या बहिणींची भटकंती

चित्रालेखा पाटील उर्फ चिऊताई कडाडल्या

> दलबदलू आमदार आणि अपक्ष उमेदवार यांच्या भूलथापांना बळी पडू नका. ते आज आहेत, उद्या नसतील. शेकापची चौथी पिढी तुमची सेवा करत आहे. म्हणूनच तुमची सूनबाई विधानसभेत काम करणार आहे. २०१४ ते २०१९ साली तत्कालीन आमदार आणि माझे सासरे पंडित पाटील यांनी अनेक विकासकामे केली आहेत. मी पण त्यांच्या पावलांवर पाऊल ठेवून त्यांना अभिमान वाटेल इतकी विकासकामे करण्यासाठी बांधील आहे.
> – चित्रलेखा पाटील

चिऊताईचाच बोलबाला

खारेपाटात जयंत पाटील, सुप्रिया पाटील प्रचाराच्या मैदानात

। भाकरवड । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील ग्रामपंचायत पोयनाड, वाघोडे हद्दीतील शेतकरी कामगार पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन आणि काही विशेष सूचना देण्यासाठी माजी आमदार जयंत भाई पाटील यांनी आवर्जून गावभेट देऊन तेथील ज्येष्ठ नागरिक, महिला बचत गट, कार्यकर्ते, युवक यांना प्रत्यक्षात भेटून हितगूज केले.

अलिबाग-मुरुड-रोहा मतदार संघाच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार चित्रलेखा नृपाल पाटील उर्फ चिऊताई यांच्या प्रचारार्थ भाई जयंत पाटील यांनी बुधवारी (दि. १३) सकाळी कुर्डुस जिल्हा परिषद मतदारसंघातील पोयनाड, वाघोडे, चोरगोंडी, आंबेघर, बांधण, चंदरवाडी आदी भागाचा दौरा केला. यावेळी प्रत्येक ठिकाणी कार्यकर्त्यांकडून त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. मागील पाच वर्षांत चित्रलेखा पाटील यांनी केलेल्या शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, बचत गट बळकटीकरण याबाबत मोठे काम केले आहे. मुलींना सायकली वाटप, नेत्रतपासणी शिबिरातून मोफत चष्मे वाटप, कोरोना काळात पीडितांना सढळ हस्ते मदत केली आहे. त्यामुळे या विभागातून मोठ्या प्रमाणात चित्रलेखा पाटील यांना मताधिक्य मिळणार, असा विश्वास मतदारांकडून •➤ पान ५ वर

आजचा अग्रलेख

चिकीखाऊ पंच नकोत

वे|ध|क

शेअर बाजार कोसळला

मुंबई : शेअर बाजारात सध्या अस्थिरतेचे वातावरण आहे. मंगळवारी बाजाराची घसरगुंडी झाली होती. बुधवारी बाजार सुरू होताच या घसरणीत आणखी वाढ झाली आणि सलग दुसऱ्या दिवशी बाजार कोसळला आहे. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीनंतर बाजाराने थोडी तेजी दाखवली होती. मात्र, आता बाजार कोसळला आहे. राष्ट्रीय शेअर बाजाराने त्याची महत्त्वाची सपोर्ट लेव्हल ब्रेक केल्याने या घसरणीत आणखी वाढ होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केल्याने गुंतवणूकदारांची धाकधूक वाढली आहे. मंगळवारी शेअर बाजार सुरू झाल्यावर त्यात थेडी तेजी दिसत होती. मात्र दुसऱ्या टप्प्यात अनेक मोठ्या शेअरचे दर कोसळल्याने बाजारात मोठी घसरण दिसून आली होती. बुधवारी बाजारात आणखी मोठी घसरण झाली आहे. बँकनिफ्टीमध्ये ११७० अंकांपर्यंत घसरण झाली होती. तर बँक निफ्टी बंद होताना १०६९ अंकांवर बंद झाला.

● अलिबाग मतदारसंघातील उमेदवारांचे नाव व चिन्ह ईव्हीएममध्ये फीड करण्याचे काम जिल्हा क्रीडा संकुलच्या हॉलमध्ये करण्यात आले. (छायाचित्र : समीर मालोदे)

प्रीतम म्हात्रेंचे बालदींना प्रत्युत्तर

। उरण । वार्ताहर ।

मुलगा हा आपल्या बापाच्या जीवावरच उड्या मारत असतो. त्यामुळे आम्ही आमच्या बापाच्या जीवावर उड्या मारतो. पण, आपण कोणाच्या जीवावर उड्या मारता, ते आमच्यावर टीका करणाऱ्यांनी सांगावे, असा खरमरीत सवाल उरण विधानसभा मतदारसंघाचे शेकापचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांनी उरण चाणजे परिसरात आयोजित करण्यात आलेल्या प्रचार रॅलीत केला आहे.

येत्या २३ तारखेला उरण विधानसभा मतदारसंघात शिट्टीचा आवाज घुमणार यात कोणतीच शंका नाही, असा विश्वास म्हात्रेंनी व्यक्त केला.

उरण विधानसभा निवडणुकीत शेकापचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांनी आघाडी घेतल्याचे बोलले जात आहे. त्यांना तरुणाईचा पाठिंबा मोठ्या प्रमाणात मिळताना दिसत आहे. बुधवारी उमेदवार प्रीतम म्हात्रे यांची प्रचार रॅली चाणजे परिसरात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी या परिसरातील आगरी, कोळी व कराडी तसेच इतर समाज बांधवांनी उत्स्फूर्तपणे स्वागत करून रॅलीला प्रतिसाद दिला. यावेळी उमेदवार प्रीतम म्हात्रे यांच्याशी पत्रकारांनी सवांद साधला •➤ पान ५ वर

मते मिळविण्यासाठी अंधश्रद्धेचा वापर

आ. गोगावले यांच्याविरोधात निवडणूक अधिकाऱ्यांकडे तक्रार

। अलिबाग । प्रतिनिधी ।

महाड विधानसभा मतदारसंघातील शिंदे गटाचे आमदार भरत गोगावले यांनी मते मिळविण्यासाठी अंधश्रद्धेचा वापर केल्याचा आरोप पिंपळवाडी येथील बाबू पांगारे यांनी केला आहे. गोगावले यांच्याविरोधात मतदान केल्यास शारीरिक अवयव दगावण्याची धमकी देण्यात आली असल्याचे पांगारे यांनी सांगितले.

निवडणुकीच्या प्रचाराला अवघे पाच दिवसच शिल्लक राहिले आहे. राजकीय वातावरण तापू लागले आहे. सभा, बैठकांच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जात आहे. महाडमध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवार स्नेहल जगताप निवडणुकीच्या रिंगणात आहेत. शिंदे गटातील महायुतीचे उमेदवार भरत गोगावले यांच्याविरोधात त्यांची लढत होणार आहेत. जगताप या उच्च शिक्षित महिला उमेदवार असल्याने प्रचारादरम्यान त्यांना मतदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. मतदारांकडून मिळत असलेल्या प्रतिसादामुळे गोगावलेंना त्याचा पराजय दिसू लागला आहे. त्यामुळे महाडमधील ग्रामीण भागातील जनतेला घाबरविण्याचा प्रयत्न गोगावले यांच्याकडून केला जात असल्याची चर्चा सुरु आहे.

पिंपळवाडी गावामध्ये रविवारी (दि. १०) भरत गोगावले यांच्या प्रचारार्थ गाव बैठक आणि प्रचारसभा घेण्यात आली. या सभेमध्ये गोगावलेंचे •➤ पान ५ वर

जत्रा बोंबल्या विठोबाची, बोंबाबोंब व्यापाऱ्यांची

आविष्कार देसाई

। रायगड ।

दिवाळी आटोपली की, गावागावांमध्ये जत्रांचा हंगाम सुरु होतो. ग्रामीण भागातील जनतेसाठी पूर्वी जत्रा हे एकमेव मनोरंजनाचे साधन होते. आजदेखील ही परंपरा सुरु आहे. जत्रांमधून कोट्यवधींची आर्थिक उलाढाल होत असते. त्यामुळे ग्रामीण स्तरावरील अर्थचक्र गतिमान होण्यास मदत मिळते. यंदा मात्र विधानसभा निवडणुका आणि जत्रांचा हंगाम यांनी एकमेकांची वेळ साधली आहे. त्यामुळे जिल्हा दंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी १९ आणि २० नोव्हेंबर या दोन दिवसांकरिता यात्रेच्या ठिकाणी केवळ दर्शन व्यवस्था सुरु ठेवून अन्य प्रकारचे सर्व मनोरंजनाचे खेळ व दुकाने बंद करुन यात्रा भरविण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे जनतेचा हिरमोड होणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

रायगड जिल्ह्यात खोपोली येथील बोंबल्या •➤ पान ५ वर

१९,२० नोव्हेंबरला फक्त देवदर्शन, मनोरंजनाचे खेळ, दुकाने बंद

जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांचे आदेश

> आम्ही दरवर्षी या जत्रेत सुक्या मच्छीचा व्यापार करत असतो. येथे खूप दुरवरून लोक जत्रेच्या निमित्ताने दर्शनासाठी व खरेदीसाठी येत असतात. सुक्या मच्छीच्या व्यापारासाठी ही जत्रा संपूर्ण महाराष्ट्रात ओळखली जाते. येथे आलेला प्रत्येक व्यक्ती येथील दुकानातून काही ना काही खरेदी करतो. यात आमची विक्री मोठ्या प्रमाणात असते. निवडणुकीमुळे नाहक दोन दिवस नुकसान सोसावे लागणार आहे.
> – अनंत साकोस्कर,सुकी मच्छी विक्रेते

अजित पवार गटाला 'सर्वोच्च' दणका

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

विधानसभा निवडणुकीचा प्रचार रंगात आलेला असतानाच अजित पवार गटाला सर्वोच्च न्यायालयाने दणका दिला आहे. शरद पवार यांचे फोटो आणि व्हिडीओ न वापरण्याचे परिपत्रक काढा, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार गटाला दिले आहेत. तसेच विधानसभा निवडणुकीमध्ये स्वतंत्र पक्ष म्हणून लढा, असा आदेशही सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार गटाला दिला.

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना अजित पवार गटाचे उमेदवार आणि कार्यकर्त्यांकडून शरद पवार यांचे फोटो, व्हिडीओ यांचा वापर होत असल्याचे दिसून आले होते. आमदार अमोल मिटकरी यांनीही शरद पवार यांचा एक व्हिडीओ आपल्या अधिकृत एक्स अकाऊंटवरून •➤ पान ५ वर

आज आवासची यात्रा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील आवास येथील यात्रा गुरुवारी (दि. १४) भरणार आहे. उद्या पहाटेपासून भाविक जागृत देवस्थान नागेश्वराचे दर्शन घेण्यासाठी गर्दी करणार आहेत. भाविकांचा प्रवास सुखकर होण्यासाठी अलिबाग एसटी बस आगारातून ज्यादा बसेस सोडण्यात येणार असल्याच माहिती आगार व्यवस्थापक राकेश देवरे यांनी दिली.

आवासमधील नागेश्वर मंदिर भाविकांचे श्रध्दास्थान आहे. यात्रेच्या दिवशी वेगवेगळ्या भागातून जिल्ह्यातून भाविक दर्शनासाठी येतात. खाद्य पदार्थांसह वेगवेगळ्या वस्तू व पूजेच्या साहित्यांची दुकाने या ठिकाणी •➤ पान ५ वर

नागेश्वराचे दर्शन घेण्यासाठी होणार अलोट गर्दी

पंतप्रधानांना संविधानाची जाणच नाही

■ गोंदिया येथील प्रचारसभेत राहुल गांधी यांची टीका

। गोंदिया । वृत्तसंस्था ।

नरेंद्र मोदी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हे २४ तास केवळ संविधानावर हल्ला करण्याचा प्रयत्न करीत असतात. हा हल्ला ते समोरून नव्हे तर बंद दारातून करतात. मोदी म्हणतात, आमच्याकडचे संविधान लाल रंगाचा आहे. मग त्यांनी सांगावे, या संविधानात फुले, आंबेडकर, भगवान बुद्ध यांचे विचार नाहीत का? माझ्या मते मोदींना संविधानाची जाणच नाही, त्यांनी संविधानाचे वाचनच केले नाही.

वाचन केले असते तर संविधानाचे महत्त्व त्यांना कळले असते, अशी टीका विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली.

मंगळवारी गोंदिया येथे महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारसभेत ते बोलत होते. मोदींनी देशात तीन काळे कृषी कायदे आणले होते. त्याविरोधात संपूर्ण देशातील शेतकरी रस्त्यावर उतरले तरीदेखील मोदी म्हणतात हे कायदे शेतकरी हिताचे आहेत. हे सरकार अंबानी आणि अदानीचे असल्याची टीकाही राहुल यांनी यावेळी केली.

विमानातील बिघाडामुळे चिखलीतील सभा रद्द

बुलढाणा : विमानातील तांत्रिक बिघाडामुळे काँग्रेस नेते राहुल गांधी यांची जिल्ह्यातील चिखली येथील प्रचार सभा रद्द करण्यात आली. मंगळवारी दुपारी १२ वाजता त्यांची चिखलीचे काँग्रेस उमेदवार राहुल बोंद्रे आणि खामगावचे उमेदवार राणा दिलीप सानंदा यांच्या प्रचारार्थ सभा आयोजित होती. मात्र, त्यांना घेऊन येणाऱ्या विमानात तांत्रिक बिघाड झाला. यामुळे ते चिखलीत येऊ शकले नाहीत. त्यांनी स्वत: चित्रफीत प्रसारित करून याबद्दल जनतेची माफी मागितली.

राहुल गांधी, रेवंत रेड्डी यांच्या सभा

मुंबई : राहुल गांधी १४ नोव्हेंबर रोजी नंदूरबार आणि नांदेड येथे, तर १६ नोव्हेंबर रोजी अकोला आणि चिमूर येथे ते सभा घेणार आहेत. याआधी राहुल यांनी नागपूर, मुंबई आणि गोंदिया येथे प्रचारसभा घेतल्या आहेत. त्याचप्रमाणे तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी हेही बुधवारी महाराष्ट्र दौऱ्यावर असून, सायंकाळी ४ वाजता ते वरळी विधानसभेत प्रचारसभा घेणार आहेत. धारावी मतदारसंघात सायंकाळी ६.३० वाजता ते धारावी मतदारसंघात रोड शो घेणार आहेत.

मोदींनी महाराष्ट्राला कमजोर केले

■ संजय राऊतांचा घणाघात

। मुंबई । वृत्तसंस्था ।

इतर पक्षांतले सर्व भ्रष्टाचारी ईडी, सीबीआयचे आरोपी, मनी लाँडरिंगवाले हे भाजपात सामील झाले आहेत. इक्बाल मिर्ची, दाऊद इब्राहिमबरोबर आर्थिक व्यवहार करणाऱ्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी व त्यांच्या महान पक्षाने आपल्या पंखाखाली घेतले आहे. संविधान, कायदा, न्यायालये आपल्या स्वार्थासाठी हवी तशी मोडून ठेवलीफक्त, असा घणाघाती आरोप शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊतांनी केला.

शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या सामना अग्रलेखातून ठाकरे गटाचे खासदार संजय राऊतांनी घणाघात केला. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक, पंतप्रधान मोदींची सभा आणि त्यांच्या सभेतील मुद्दे यावरुन त्यांनी टीका केली. 'बटेंगे तो कटेंगे' अशा गर्जना करणे सत्ताधारी पक्ष व त्यांच्या नेत्यांना शोभत नाही. आपण एकाच राज्याचे व एकाच धर्माचे पंतप्रधान आहोत अशा आवेशात मोदी वागत असतील तर ते बरे नाही. महाराष्ट्रासारखे एकेकाळचे बलवान राज्य त्यांनी कमजोर करून ठेवले व पिचक्या पाठकण्याचे लोक त्यासाठी सत्तेवर आणले. हा एक प्रकारे महाराष्ट्रद्रोहच आहे. धार्मिक ध्रुवीकरण करून निवडणुका जिंकण्यावर मोदी यांचा भर आहे व त्यासाठीच 'बटेंगे तो कटेंगे, एक है तो सेफ है'ची घोषणा ते देतात, असे संजय राऊत म्हणाले.

महाराष्ट्रात भ्रष्टाचार, देशद्रोह वगैरेंचा मुद्दा पंतप्रधानांनी आणला, पण मोदी यांनी हे भ्रष्टाचारी व देशद्रोही कोण याबाबत खुलासा का करू नये? इतर पक्षांतले सर्व भ्रष्टाचारी ईडी, सीबीआयचे आरोपी, मनी लाँडरिंगवाले हे भाजपात सामील झाले आहेत. इक्बाल मिर्ची, दाऊद इब्राहिमबरोबर आर्थिक व्यवहार करणाऱ्यांना श्री. मोदी व त्यांच्या महान पक्षाने आपल्या पंखाखाली घेतले आहे. संविधान, कायदा, न्यायालये आपल्या स्वार्थासाठी हवी तशी मोडून ठेवली. देश एखाद्या व्यापाऱ्यासारखा चालवून मोदी यांनी सर्व सार्वजनिक संपत्ती आपल्या एकाच उद्योगपती मित्राच्या हवाली केली. हे काय देशभक्तीचे लक्षण झाले? असा सवालही संजय राऊतांनी उपस्थित केला.

फसवेगिरीत भुजबळांनी सर्व मर्यादा ओलांडल्या

■ नाशिकमधील प्रचार सभेत ज्येष्ठ नेते शरद पवार यांची टीका

। नाशिक । वृत्तसंस्था ।

एखाद्याने चुकीचे काम, फसवेगिरी किती करावी याला काही मर्यादा असतात. या सर्व मर्यादा त्यांनी ओलांडल्या असून, अशा धोकेबाजाला विधानसभा निवडणुकीत घरचा रस्ता दाखविण्याची वेळ आली आहे, असे आवाहन करत राष्ट्रवादीचे (शरद पवार) अध्यक्ष शरद पवार यांनी राष्ट्रवादीचे (अजित पवार) ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना लक्ष्य केले.

महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ शरद पवार यांच्या मंगळवारी येवल्यासह जिल्ह्यातील पाच मतदारसंघात जाहीर सभा झाल्या. यातील चार मतदारसंघ हे अजित पवार गटाच्या आमदारांचे होते. येवला येथील

सभेत भुजबळांवर अतिशय कठोर शब्दांत पवार यांनी टीका केली.

भुजबळ यांना गृहमंत्रीपद सोडावे लागल्याचा दाखला पवार यांनी दिला. अशाच चुकीच्या उद्योगामुळे त्यांना तुरुंगात जावे लागले. अडचणीच्या काळात आपण त्यांना आधार दिला. कारागृहात कोणी त्यांना भेटायला तयार नव्हते. तेव्हा मुलगी भेटायची. त्यांच्या सर्व चुका विसरून आतापर्यंत प्रत्येक गोष्टीत सहकार्य केले होते, याकडे पवार यांनी लक्ष वेधले.

भुजबळ यांच्या कारनाम्यांचे दाखले देत पक्षाला फसविणाऱ्यास येवलेकरांनी धडा शिकवावा, असे आवाहन त्यांनी केले. आपल्या संपूर्ण भाषणात पवार यांनी भुजबळ यांचे नाव एकदाही घेतले नाही.

पोवाडा, जाखडी, पथनाट्यातून जागृती

रत्नागिरी : विधानसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी प्रशासनाचा जोरदार प्रयत्न सुरू आहे. त्यासाठी ठिकठिकाणी बॅनर, ध्वनिक्षेपकाद्वारे जनजागृती केली जात आहे. रत्नागिरीतील पेठकिल्ला येथील मत्स्य व्यवसाय प्रशिक्षण केंद्र येथे प्रशासनाकडून मतदान जनजागृती करण्यात आली. या वेळी पोवाडा, जाखडी व पथनाट्य कार्यक्रम आयोजित करण्यात आले. यातून मतदारांना मतदानासाठी प्रवृत्त करण्यात आले. या वेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी राजाराम म्हात्रे, नोडल अधिकारी चेतन शेळके, इंद्रजित चाळके, मयूर बेहेरे, हिंमत पाटील व इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

मोहोळमध्ये ढोबळे पिता-पुत्राचे निराळे सूर!

। सोलापूर । वृत्तसंस्था ।

गेली दहा वर्षे भाजपमध्ये राहिलेले आणि विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर 'घरवापसी' केलेले माजी मंत्री प्रा. लक्ष्मण ढोबळे यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात मोठी जबाबदारी देण्यात आली आहे. पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी त्यांची वर्णी लागली आहे. एकीकडे वडिलांना पक्षात मानाचे पान मिळाले असताना दुसरीकडे त्यांचे पुत्र अभिजीत ढोबळे यांनी पक्षाच्या विरोधात सूर आळवला आहे. त्यामुळे हा चर्चेचा विषय झाला आहे.

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर प्रा. ढोबळे यांनी दहा वर्षांपासूनचा भाजपबरोबर कसाबसा चाललेला संसार मोडीत काढून राष्ट्रवादी शरद पवार पक्षात प्रवेश केला होता. मोहोळ राखीव



विधानसभा मतदारसंघातून त्यांचे पुत्र अभिजीत ढोबळे आणि कन्या कोमल साळुंखे- ढोबळे या दोघांनी राष्ट्रवादी शरद पवार पक्षाकडे उमेदवारीची मागणी केली होती. पक्षाने राजू खरे यांना उमेदवारी दिली आहे.

दरम्यान, राज्यातील राजकारणात दलित चेहरा म्हणून ओळखले जाणारे आणि पूर्वी अनेक वर्षे शरद पवार यांच्यावर निष्ठा वाहिलेले माजी मंत्री प्रा. लक्ष्मण ढोबळे हे 'घरवापसी' करताच त्यांना राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदावर सामावून घेण्यात आले आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी त्यांना नेमणूकपत्र प्रदान केले आहे. प्रा. ढोबळे यांनी २०१४ नंतर शरद पवार यांची साथ सोडत भाजपमध्ये प्रयत्नपूर्वक प्रवेश मिळविला होता. त्यांच्यावर पक्षाच्या प्रदेश प्रवक्ते पदाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. परंतु, अलीकडे ते भाजपमध्ये फारसे रमले नव्हते. ते पक्षात माघारी फिरले आहेत.

तथापि, दुसरीकडे मोहोळ राखीव मतदार संघातून उमेदवारी डावलली गेल्यामुळे नाराज झालेले प्रा. ढोबळे यांचे पुत्र अभिजीत ढोबळे यांनी मात्र राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या विरोधात सूर आळवायला सुरुवात केली आहे. पक्षाचे उमेदवार राजू खरे यांच्या विषयी त्यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली असून खरे यांच्या अवतीभवती शिवसेना एकनाथ शिंदे गटाच्या मंडळींचा वावर असतो. जे पक्षाचे सदस्य होते, त्यांना उमेदवारी डावलण्यात आली आणि जे पक्षाचे सदस्य नव्हते, त्यांना उमेदवारी देण्यात आल्याबद्दल अभिजीत ढोबळे यांनी नाराजी व्यक्त केली आहे. राजू खरे हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निकटवर्तीय आहेत. त्यांचा प्रचार करायचा की नाही, याबाबतचा निर्णय येत्या १४ नोव्हेंबर रोजी आपण कार्यकर्त्यांच्या बैठकीत घेणार आहोत, असे ढोबळे यांनी सांगितले.

भाजप आमदारांच्या प्रतिमेला चपलांचा हार

। गडचिरोली । वृत्तसंस्था ।

छत्तीसगड सीमेलगत कोरची तालुक्यातील झेंडेपार लोहखाणीचा मुद्दा पुन्हा एकदा जोरदार तापला आहे. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी लावलेल्या फलकावरील भाजप आमदार कृष्णा गजबे यांच्या प्रतिमेला चपलाचा हार घालून गावकऱ्यांनी निषेध व्यक्त केला. ''झेंडेपार विकणारा आमदार कृष्णा गजबे'' अशा आशयाचे फलक देखील लावले होते.

गडचिरोली जिल्ह्यात खाणीच्या प्रश्नावरून ग्रामसभा आणि प्रशासन असा संघर्ष नवा नाही. वेळोवेळी यावरून खडाजंगी उडत असते. कोरची तालुक्यातील झेंडेपार खाणीवरून देखील त्याभागातील गावकऱ्यांमध्ये खदखद आहे.

सध्या विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला असताना स्थानिक आमदार कृष्णा गजबे यांना पुन्हा एकदा रोषाचा सामना करावा लागतो आहे. झेंडेपार गावात प्रचारासाठी लावलेल्या 'बॅनर'वरील आमदारांच्या प्रतिमेला गावकऱ्यांनी चक्क चपलाचा हार घातला. ''झेंडेपार विकणाऱ्या आमदार कृष्णा गजबे यांचा निषेध'' असे लिहिले. यावरून गावात काहीकाळ वातावरण तापले होते. आमदारांच्या कार्यकर्त्यांना माहिती होताच 'बॅनर' तात्काळ हटवण्यात आले. मात्र, समाज माध्यमावर संबंधित छायाचित्र सार्वत्रिक झाल्याने 'ते' बॅनर सर्वत्र चर्चेचा विषय ठरले आहे.

झेंडेपार लोह खाणीचा मुद्दा तापला

झेंडेपारमध्ये उत्खनन सुरु नाही

छत्तीसगड सीमेलगत असलेल्या झेंडेपार येथील टेकडीवर ४६ हेक्टर परिसरात लोह खनिजाच्या उत्खननासाठी जवळपास १५ वर्षांपूर्वी अगरवाला आणि इतर चार भागीदार कंपनीना कंत्राट देण्यात आले होते. तेव्हापासून स्थानिक आदिवासी आणि ग्रामसभांचा या खाणीला विरोध आहे. त्यामुळे प्रशासनाला तीनदा जनसुनावणी स्थगित करावी लागली. सद्यस्थितीत लिज क्षेत्रात कोणतेही उत्खनन सुरू नाही.

ग्रामसभा, स्थानिकांचे म्हणणे काय?

खाणीमुळे विकास होणार, रोजगार मिळणार असे चित्र रंगवल्या जात आहे. मात्र, दक्षिण गडचिरोलीतील परिस्थिती बघून नागरिकांचा भ्रमनिरास झाला आहे. त्यामुळे झेंडेपार परिसरातही हीच स्थिती उद्भवू शकते, अशी भीती त्यांना आहे. ग्रामसभांच्या दाव्यानुसार, कोरची तालुका हा संविधानाच्या कलम २४४ (१) व ५ व्या अनुसूचीमध्ये समाविष्ट आहे. वनहक्क कायदा २००६ चे नियम २००८, सुधारित नियम २०१२ नुसार ग्रामसभांना सामूहिक वनहक्क मान्यता आहे.

काँग्रेसच्या समन्वयकपदी खलिफे, बेटकर, कीर

रत्नागिरी : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रत्नागिरी जिल्हा काँग्रेस कमिटीच्या समन्वयकपदी हुस्नबानू खलिफे, सहदेव बेटकर, रमेश कीर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्यावतीने ही नियुक्ती झाली आहे. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अविनाश लाड यांनी बंडखोरी केल्यानंतर प्रदेशस्तरावर लाड यांना पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित केल्याची कारवाई केली आहे. निवडणुकीमध्येच ही कारवाई झाल्यामुळे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण होऊ नये यासाठी पक्षश्रेष्ठींनी तातडीने समन्वयकपदी नियुक्ती केली आहे. ही नियुक्ती महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्नितथलालजी यांच्या आदेशानुसार प्रांताध्यक्ष नाना पटोलेंच्या निर्देशानुसार करण्यात आली आहे.

महाविकास आघाडीचा संगमेश्वरात प्रचार

। संगमेश्वर । वृत्तसंस्था ।

■ आरवली, कडवई, कसब्यात गावभेट
■ व्यापारी, मतदारांशी संवाद

संगमेश्वर तालुक्यातील आरवली, कडवई, माखजन, कसबा आणि देवरूख शहरात गावभेट दौरा, प्रचार फेरी आणि घराघरात प्रचार करत महाविकास आघाडीने वातावरण ढवळून काढले आहे. विधानसभा निवडणूक आता काही दिवसांवर येऊन ठेपली असल्याने प्रचारात रंगत येऊ लागली आहे. चिपळूण मतदारसंघात महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी थेट लढत होत आहे. महायुतीकडून शेखर निकम तर महाविकास आघाडीकडून प्रशांत यादव मैदानात उतरले आहेत. या मतदारसंघात चिपळूण तालुक्यात १५१ बूथ, तर संगमेश्वर तालुक्यात १४९ बूथ आहेत. त्यामुळे दोन्ही तालुक्यातील मतदान काही प्रमाणात समसमान आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार प्रशांत यादव यांनी आरवली, माखजन बाजारपेठेतील व्यापाऱ्यांशी संवाद साधत प्रचार फेरी काढली. आरवली, माखजननंतर कडवई जिल्हा परिषद गटात महाविकास आघाडीकडून गावभेट कार्यक्रम राबविण्यात आला. कसबा येथे गावभेट दौरा करत येथील सभागृहात बैठक घेण्यात आली. यावेळी शिवसेना जिल्हा सहसंपर्कप्रमुख राजेंद्र महाडिक, उमेदवार प्रशांत यादव, रोहन बने, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सुरेश बने, शिवसेना तालुकाप्रमुख बंड्या बोरूरकर, राष्ट्रवादीचे दत्ता लिंगायत, सुजित महाडिक आदी उपस्थित होते.

मतदारांना मतदानादिवशी सुट्टी जाहीर

। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।

विधानसभा निवडणुकीमध्ये सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी मतदारांना मतदानाच्या दिवशी सुट्टी देण्याबाबतचे शासन परिपत्रक उद्योग ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने निर्गमित केले आहे. अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टीऐवजी कमीत कमी २ तासांची सवलत द्यावी. याची दक्षता संबंधित आस्थापनांनी घेणे आवश्यक राहील, असे सहाय्यक कामगार आयुक्त संदेश आयरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रातील कोणत्याही व्यवसायात, व्यापारात, औद्योगिक उपक्रमात किंवा इतर कोणत्याही आस्थापनांमधील कार्यरत असलेल्या आणि राज्याच्या विधानसभेच्या निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार असलेल्या प्रत्येक व्यक्तीला मतदानाच्या दिवशी सुट्टी दिली जाईल. ही सुट्टी उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या सर्व उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना इत्यादींना लागू राहील. मंजूर झालेल्या सुटीच्या कारणास्तव अशा कोणत्याही व्यक्तीच्या वेतनात कोणतीही कपात केली जाणार नाही. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन तासांची सवलत मिळेल, याची दक्षता संबंधित आस्थापनांनी घेणे आवश्यक आहे.

संगमेश्वर बाजारपेठेत पोलिसांचे संचलन

संगमेश्वर : संगमेश्वर पोलीस ठाण्याच्यावतीने संगमेश्वर बाजारपेठेतून रूट मार्च काढण्यात आला. संगमेश्वर ठाण्याचे पोलीस निरीक्षक अमित यादव यांच्या मार्गदर्शनाखाली हा रूट मार्च काढण्यात आला. सर्वत्र विधानसभा निवडणुकीचे वातावरण आहे. त्यामुळे निवडणूक भयमुक्त होण्यासाठी हा रूट मार्च काढण्यात आला. सेंट्रल सेक्युरिटी फोर्स या रूट मार्चमध्ये सहभागी झाली होती.

नालासोपाऱ्यात १२१ नागरिकांचे गृहमतदान

। वसई । वृत्तसंस्था ।

वसई पाठोपाठ नालासोपारा मतदारसंघात ही शनिवारी वयोवृद्ध व ज्येष्ठ नागरिकांची गृह मतदान प्रक्रिया पार पडली. १३० अर्जदारापैकी १२१ नागरिकांनी उस्फुर्तपणे मतदान करीत आपल्या मतदानाचा हक्क बजावला. निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार ८५ वर्ष व त्यापेक्षा जास्त वय असणाऱ्या मतदारांना तसेच ४० टक्क्यांपेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या मतदारांना गृह मतदानाची सुविधा

उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधेचा लाभ घेण्याकरीता संबंधित मतदारांना आवश्यक असलेल्या १२ डी नमुन्याचे वाटप केले होते. त्यापैकी १३० मतदारांनी १३२ निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर केले होते.

शनिवारी या मतदारसंघात या मतदानांची प्रक्रिया पार पडली. या प्रक्रियेसाठी १३ पथके तयार करण्यात आली होती. त्यांच्याद्वारे मतदारांच्या घरी मतपेटी घेऊन जाऊन मतदान घेण्यात आले. गृह मतदानासाठी नोंदणी झालेल्या १३० मतदारांपैकी १२१ नागरिकांनी गृह मतदानाचा हक्क बजावला असे निवडणूक निर्णय अधिकारी शेखर घाडगे यांनी सांगितले आहे. यापूर्वी ज्येष्ठ नागरिक आणि अपंग मतदारांना मतदान करण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र. यावेळी गृह मतदान पद्धतीमुळे ज्येष्ठ नागरिक आणि अपंगांना मतदान करणं सोप्प झालं आहे. त्यामुळे मत टक्का वाढण्यास ही मोठी मदत होणार आहे. तर आदल्या दिवशी १३३ वसई मतदारसंघात ही गृहमतदान घेण्यात आले होते. तेव्हा ३७४ नागरिकांपैकी ३६० नागरिकांनी गृहमतदानाचा हक्क बजावला होता.

हितेंद्र ठाकुरांसमोर विरोधक फिरकलेच नाहीत

आमनेसामने कार्यक्रमात ठाकुरांचेच वर्चस्व

। वसई । वृत्तसंस्था ।

वसई विधानसभेतील सर्व उमेदवारांना एकाच व्यासपीठावर आणण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात हितेंद्र ठाकुरांसमोर येण्याचे विरोधक उमेदवारांनी टाळले. काँग्रेसने आपला प्रतिनिधी पाठवला तर भाजपच्या स्नेहा दुबे आल्याच नाहीत. त्यामुळे हितेंद्र ठाकूर यांनी मैदान साफ असल्याने आपली भूमिका जोरदारपणे मांडून कार्यक्रमात वर्चस्व मिळवले.

वसईत न्यू इंग्लिश स्कुल माजी विद्यार्थी महासंघ आणि जागरूक नागरिक संस्थेतर्फे 'विधानसभेसाठी आम्हीच का?' हा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात वसई विधानसभेतील सर्व उमेदवार जनतेशी संवाद साधून आपली बाजू स्पष्ट करणार होते.

सत्ताधारी आ. हितेंद्र ठाकूर यांना समोरासमोर जाब विचारण्याची चांगली संधी विरोधकांना होती. मात्र या कार्यक्रमात महाविकास आघाडीचे

विजय पाटील आणि भाजपच्या स्नेहा दुबे यांनी ठाकुरांसमोर यायचे टाळले. विजय पाटील यांच्या वतीने प्रतिनिधी म्हणून जिमी घोन्सालविस यांनी बाजू मांडली. भाजपातर्फे कुणीच फिरकलं नाही.

प्रमुख उमेदवार गैरहजर असल्याने हितेंद्र ठाकूर यांनी मिळालेल्या संधीचा चांगला फायदा घेतला आणि आपण केलेल्या कामांची आणि भविष्यातील नियोजनाची माहिती दिली.

विरोधकांच्या अनुपस्थितीची चर्चा..

प्रत्यक्षात सर्वच उमेदवार या ठिकाणी यायला हवे होते. आताच ते उमेवार जनतेसमोर येत नाहीत तर मग नंतर ते आमचे प्रश्न कसे सोडवतील, अशा भावना यावेळी कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या नागरिकांनी व्यक्त केल्या. २०१९ च्या निवडणुकीच्यावेळी देखील विरोधकांनी या कार्यक्रमाकडे पाठ फिरवली होती. त्याचीच यंदा पुनरावृत्ती झाली. विरोधकांना मला प्रश्न विचारण्याची संधी होती. मात्र ती संधीसुद्धा या विरोधकांनी गमावली असे ठाकूर यांनी सांगितले.

वसईतील महायुतीमध्ये धुसफूस

। वसई । वृत्तसंस्था ।

■ शिवसेना, राष्ट्रवादी पक्ष नाराज

निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला असताना वसईतील महायुतीमधील शिवसेना आणि राष्ट्रवादी हे घटक पक्ष नाराज असल्याचे समोर आले आहे. भाजपाकडून आम्हाला योग्य मान सन्मान मिळत नाही, विचारात घेतले जात नाही अशी तक्रार दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी केली आहे. या नाराजीमुळे तसेच आमंत्रण न मिळाल्याचे सांगत शुक्रवारी झालेल्या भाजप नेत्या स्मृती ईराणी यांच्या सभेलाही दोन्ही पक्षांचे नेते गैरहजर होते.

वसई विधानसभा मतदारसंघात भाजपाच्या स्नेहा दुबे-पंडित या महायुतीच्या उमेदवार म्हणून निवडणूक लढवत आहेत. अर्ज भरण्याच्या आदल्या दिवशी त्यांची उमेदवारी जाहीर झाली आणि त्यांना पक्षात प्रवेश देण्यात आला. सध्या स्नेहा दुबे यांचा प्रचार सुरू असला तर महायुतीमधील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि शिवेसना (शिंदे गट) भाजपावर नाराज आहेत. भाजप नेत्या स्मृती ईराणी यांची शुक्रवारी वसईत सभा झाली. या सभेला देखील दोन्ही पक्षांचे नेते गैरहजर होते. त्यामुळे महायुतीमध्ये असलेली धुसफूस समोर आली आहे.

मी पक्षाचा जिल्हाध्यक्ष आहे. मात्र मला कार्यक्रमाला कळवलंच नव्हतं तर मी कसा जाऊ? असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेसचे वसई विरार जिल्हाध्यक्ष राजाराम मुळीक यांनी केला. आम्हाला मान सन्मान दिला जात नाही, विचारात घेतले जात नाही, असा आरोपही मुळीक यांनी केला. शिवसेना जिल्हाध्यक्ष निलेश तेंडोलकर यांनीही संताप आणि नाराजी व्यक्त केली आहे. उमेदवारी अर्ज भरून आज १३ दिवस उलटून गेले. अद्यापही आम्हाला काहीच विचारण्यात आलेले नाही. स्मृती ईराणी यांच्या सभेचे अधिकृत आमंत्रण देण्यात आले नाही. कार्यक्रम सुरू असताना ऐनवेळी फोन केला गेला.

प्रीतम म्हात्रे उरणचे आमदार होणार

महाराष्ट्रात शेकाप, शिवसेना (उद्धव ठाकरे), राष्ट्रवादी (शरद पवार), काँग्रेस, आप, समाजवादी पार्टी, कम्युनिष्ट पक्ष, आरपीआय डेमोक्रॅटीक पक्ष अशी महाविकास आघाडी असून या मविआ व इंडिया अलायन्स पुरस्कृत शेकापचे १९० उरण विधानसभेचे उमेदवार प्रीतम जे.एम. म्हात्रे हे उरणचे आमदार होतील, असे वातावरण आहे.

सुधाकर लाड

उरण विधानसभा मतदार संघ हा पूर्वीपासून शेकापचा बालेकिल्ला आहे. उरण, पनवेल आणि अलिबाग तालुक्यातील काही भागांचे या मतदार संघात समावेश करून १९० हा उरण मतदार संघ तयार झाला. या मतदार संघात २००९ साली प्रथम निवडून येण्याचा मान शेकापचे विवेकानंद शंकर पाटील यांना मिळाला होता. त्यानंतर २०१४ ला झालेल्या विधानसभा निवडणूकीत शिवसेनेचे मनोहर भोईर हे निवडून आले. २०१९ ला झालेल्या विधानसभा निवडणूकीत शेकापचे विवेकानंद पाटील, शिवसेनेचे मनोहर भोईर या आजी-माजी आमदारांना भारतीय जनता पार्टी पुरस्कृत अपक्ष उमेदवार महेश बालदी यांनी पराभूत करून विजय मिळवला होता.

या मतदार संघातील मतदार हा पाच वर्षांनी लोकप्रतिनिधी बदलतो, असा या मतदार संघाचा नावलौकिक आहे. यावेळी माजी आ. मनोहर भोईर, विद्यमान आ. महेश बालदी यांना पराभूत करून प्रीतम म्हात्रे यांना या मतदार संघातील मतदार विजयी करतील आणि बदल घडवतील असेच या मतदार संघात वातावरण आहे.

प्रीतम म्हात्रे या तरूण नेतृत्वाच्या पाठीशी पनवेलचे उद्योजक आदर्श माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे यांच्या नावाची पुण्याई उभी आहे. २००१ साली झालेल्या पनवेल नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदाच्या थेट निवडणूकीत शेकापचे उमेदवार म्हणून जे. एम. म्हात्रे यांनी निवडणूक लढविली होती. त्यावेळी शेकापचे ज्येष्ठ नेते मा. आ. दत्तुशेठ पाटील, तत्कालीन आ. विवेकानंद पाटील आणि इतर स्थानिक नेत्यांच्या, कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनाने व सहकार्याने जे. एम. म्हात्रे यांनी या नगराध्यक्षपदाच्या निवडणूकीत विजय मिळवला होता. आणि एक यशस्वी उद्योजक असलेले जे. एम. म्हात्रे ऐतिहासिक पनवेल नगरपरिषदेचे अध्यक्ष झाले. पाच वर्षे त्यांनी पनवेल नगरपरिषदेचा लोकाभिमुख असा कारभार करून एक लोकप्रिय कार्यसम्राट आणि आदर्श नगराध्यक्ष अशी स्वत:ची स्वच्छ प्रतिमा पनवेलच्या नागरिकांसमोर उभी केली. आपल्या नगराध्यक्षपदाच्या कारकिर्दित भ्रष्टाचारमुक्त पनवेल नगरपरिषदेचा कारभार करून जे. एम. म्हात्रे यांनी पनवेल नगर परिषदेच्या जुन्या वास्तूचा कायापालट करून आपल्या नगराध्यक्षपदाच्या कारकिर्दीत शुभारंभ केला.

पनवेल नगरपरिषदेची स्थापना १ सप्टेंबर, १८५२ रोजी झाली. १ सप्टेंबर २००२ रोजी पनवेल नगरपरिषदेला १५० वर्षे होत असल्याचे औचित्य साधून नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे यांनी शतकोत्तर सुवर्ण महोत्सव साजरा करण्याचे आयोजन केले होते. हा सुवर्ण महोत्सव साजरा करण्यासाठी त्यांनी सर्वपक्षीय समन्वय समितीची स्थापना केली आणि सुंदर अशा सोहळ्याची आखणी करून या सोहळ्याला तत्कालीन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत हा दिमाखदार सोहळा पार पाडला. या सोहळ्यानंतर पनवेल नगरपरिषदेचे एक नवे सुवर्ण पर्व सुरू झाले.

नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे यांनी प्रामाणिक प्रयत्न करून लोक सहभाग घेऊन अनेक विकासकामे उभी केली. शहराच्या स्वच्छतेला प्राधान्य दिले. पनवेलमधील गरीब झोपट्टीवासीयांच्या पुनर्वसन योजनेसाठी नियोजित आराखडा तयार केला. पनवेलमध्ये भाजी मार्केटजवळच्या तलावाजवळ वाणिज्य संकुल उभारले. पनवेल शहरातील अनेक उद्यानाचे सुभोभिकरण केले. सुधारीत पाणी पुरवठा योजना राबवली, क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह उभारण्यासाठी १३ जुलै, २००६ रोजी ठराव करून आर्थिक तरतुद करून कामाला सुरूवात केली. जे. एम. म्हात्रे यांनी असंख्य विकास कामे केल्याने पनवेल शहराला नवसंजीवनी देणारा शेकापचा एक लोकप्रिय नगराध्यक्ष अशी जे. एम. म्हात्रे यांची पनवेल शहरात ओळख निर्माण झाली. अशा कर्तृत्ववान वडीलांचा आणि शेकापचा वारसा प्रीतम म्हात्रे यांना लाभलेला आहे. वडिलांच्याच पावलावर पाऊल टाकत आहेत.

प्रीतम म्हात्रे यांनी बीएससी पर्यंत शिक्षण घेतल्यावर शेतकरी कामगार पक्षाचे पनवेल तालुका पुरोगामी युवक संघटनेचे अध्यक्ष म्हणून कार्य करीत राजकारणात पाऊल टाकले. शेतकरी कामगार पक्षाच्या पुरोगामी युवक संघटनेच्या माध्यमातून कार्य करणारे प्रीतम म्हात्रे अल्पावधीतच आपल्या कार्यामुळे लोकप्रिय युवा नेते झाले. त्यांच्या नेतृत्वाखाली युवकांना, तरूणांना त्यांनी संघटीत केले. अनेक आंदोलनात, तरूण सहभागी होऊ लागले. त्याचबरोबर नोकरी, व्यवसायासाठी आपल्या हक्कांसाठी जागृत होऊ लागले. प्रीतम म्हात्रे यांना तरूणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळू लागला. प्रीतम म्हात्रे यांचे कर्तृत्व पाहून शेकापने त्यांना २०११ ला झालेल्या नगरपरिषदेच्या निवडणूकीच्या मैदानात उतरवले आणि मोठ्या मताधिक्क्याने ते या निवडणूकीत विजयी झाले. नगरसेवक म्हणून काम करताना प्रीतम म्हात्रे यांनी पनवेल शहरातील नागरी समस्या, लोकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली. २०१७ ला झालेल्या पनवेल महानगरपालिकेच्या निवडणूकीत प्रीतम म्हात्रे पुन्हा निवडून आले आणि महापालिकेचे विरोधीपक्ष नेता झाले. विरोधी पक्षनेता म्हणून त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी महानगरपालिका क्षेत्रातील अनेक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले. भाजपसारख्या विरोधीपक्षाची सत्ता असतानाही प्रीतम म्हात्रे यांनी विधायक कामांना विरोध न करता आपल्या कामाचा एक वेगळा ठसा उमटवला आहे. प्रीतम म्हात्रे यांना राजकारणाबरोबरच समाजकारणाची देखील आवड आहे. जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून ते नेहमी समाजासाठी वेगवेगळे उपक्रम राबवित असतात.

गरीब विद्यार्थ्यांना वह्या-पुस्तकांसारखे शालेय साहित्य, दिवाळीत गरीब व गरजु लोकांसाठी डाळ, रवा, मैदा, तेल, तुप, साखर या जिवनावश्यक वस्तू स्वस्त दरात पुरवणे असे सामाजिक कार्य ते करीत असतात. कोरोना महामारीच्या काळात जे. एम. चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून प्रीतम म्हात्रे यांनी कोरोनाग्रस्तांना मोठा दिलासा दिला. असंख्य कोरोनाग्रस्थांचे प्राण वाचवले होते. पनवेल-उरण मधील कोरोनाग्रस्त रूग्णांसाठी औषधोपचार, रक्तदान शिबीरांचे आयोजन केले होते. उरण, पनवेलमधील अनेक कुटुंबियांना गरीब, गरजु, झोपट्टीवासीयांना डाळ, तांदूळ, तेल इत्यादी जिवनावश्यक वस्तूंचे वाटप केले होते आणि कोरोनाच्या महामारीत लोकांना जगण्याचे बळ दिले होते. गेल्या वर्षी इर्शाळवाडी येथे झालेल्या भूस्खलनामुळे अपघातग्रस्त झालेल्या आदिवासी कुटुंबातील लोकांना मदतीचा हात जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेने पुढे केला. या अपघातग्रस्तांना सर्वतोपरी मदतीचा हात जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेने देऊन मानवतेचे दर्शन घडवले होते.

जे. एम. म्हात्रे यांनी खालापूर तालुक्यातील नढाळ येथे श्री पंचायतन मंदिर (पाच मंदिरे) उभारली आहेत. यात साईबाबा, हनुमान, गणपती, नढाळेश्वर महादेव, भवानी माता अशी पाच देवतांची मंदिरे उभारली आहेत. या शांत आणि सुंदर अशा मंदिर परिसरात पनवेल-पुणे महामार्गावरून जाणारे पंढरपुरचे वारकरी, एकविरा देवीचे दर्शनासाठी कार्ला येथे जाणारे भक्त विश्रांती घेण्यासाठी थांबतात. येथे येणाऱ्या लोकांसाठी चहा, पाणी, प्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. या मंदिराच्या परिसरात या परिसरातील गरीब, गरजु विद्यार्थ्यांसाठी के.जी. पासून दहावीपर्यंत मोफत शिक्षण घेण्याची व्यवस्था हिमांशू पाटील विद्यालयाच्या माध्यमातून केली आहे. आध्यात्म, प्रसाराबरोबरच शैक्षणिक प्रसार करीत असलेले जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचे हे कार्य वैशिष्ट्यपूर्ण असे आहे.

वडिलांच्या या जनसेवेचा आणि आध्यात्माचा हा वारसा प्रीतम म्हात्रे यशस्वीपणे पुढे चालवित आहेत. पनवेल येथे होत असलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील साहेब यांचे नांव देण्यात यावे यासाठी प्रीतम म्हात्रे यांनी मागणी केलेली आहेच, याचबरोबर या आंतरराष्ट्रीय विमानतळ प्राधिकरणात पनवेल, उरण, नवी मुंबईतील भूमिपुत्र तरूण मुला-मुलींना नोकरी मिळावी यासाठी प्रीतम म्हात्रे यांनी यशस्वी प्रयत्न केले आहेत.

प्रीतम म्हात्रे यांनी भूमिपुत्र तरूणांना योग्य ते विनामुल्य प्रशिक्षण देण्याचे काम सुरू केले असून आजपर्यंत ४४ तरूणांना नवी मंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्राधिकरणात नोकरी मिळवून देण्यात प्रीतम म्हात्रे यशस्वी झाले आहेत. नवी मुंबई विमानतळ प्राधिकरणात पनवेल, उरण, नवी मुंबई परिसरातील जवळवपास २ हजार तरूणांना नोकऱ्या देण्याची घोषणा प्रीतम म्हात्रे यांनी केली आहे. पनवेल, उरण, नवी मुंबईमध्ये येऊ घातलेल्या राज्य शासनाच्या आणि केंद्र शासनाच्या प्रकल्पांत स्थानिक भूमिपुत्रांना अग्रक्रमाने नोकऱ्या मिळायलाच पाहिजेत, अशी स्पष्ट भूमिका प्रीतम म्हात्रे आपल्या निवडणूक प्रचारात मांडत आहेत. यामुळे उरण विधानसभा मतदार संघातील वातावरण ढवळून निघाले आहे. बेरोजगार तरूण मुले, मुली, शेतकरी, कामगार, महिला, वृद्ध नागरीक प्रीतम म्हात्रे यांच्याकडे एका अश्वस्त भावनेने तसेच उद्याचे विधान सभेतील नेतृत्व म्हणून पहात आहेत. प्रीतम म्हात्रे यांना उरण विधानसभा मतदार संघातील मतदार विजयी करून नवीन बदल घडवून आणतील, असेच वातावरण आहे.

(ज्येष्ठ पत्रकार/इतिहास संशोधक/लेखक/छायाचित्रकार)
भ्रमणध्वनी : ९२२४२३२९६३

बाळाराम पाटील यांच्या प्रचाराला वेग

पनवेल : पनवेल विधानसभा महाविकास आघाडी आणि शेकापचे उमेदवार बाळाराम पाटील यांच्या प्रचाराने आता चांगलाच जोर धरला आहे. महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते घरोघरी जाऊन शिट्टी या चिन्हासमोरील बटण दाबून बाळाराम पाटील यांना प्रचंड बहुमताने विजयी करा, असे आवाहन करत आहेत.

पनवेल शहर आणि तालुका, खांदा वसाहत, कळंबोली, कामोठे, नवीन पनवेल, खारघर, तळोजा आदी भागातील महाविकास आघाडीचे पदाधिकारी हे बाळाराम पाटील यांना विजयी करण्यासाठी रस्त्यावर उतरले आहेत. त्यांच्या प्रचाराला चांगला प्रतिसाद मिळत आहे. पनवेल विधानसभा शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार बाळाराम पाटील यांच्या शिट्टी या चिन्हासमोरील बटण दाबून प्रचंड मतांनी विजयी करा, अशा स्वरुपाच्या पत्रकांचे वाटप सुरू आहे. या प्रचारात तरुण वर्ग सुद्धा मोठ्या हिरारीने भाग घेत आहेत. महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी आता प्रचारात एकरुप होऊन उतरले असून शिट्टीचा आवाज प्रत्येक शहरात, गल्लीत, विभागात घुमू लागला आहे. यामुळे माजी आमदार बाळाराम पाटील यांनी प्रचारात घेतलेल्या आघाडीमुळे विरोधकांना चांगलीच धडकी भरली आहे.

महाविकास आघाडी तथ शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार बाळाराम पाटील यांच्या प्रचारार्थ खासदार निलेश लंके यांची जाहीर सभा गुरूवारी (दि.१४) सायंकाळी ५ वाजता कामोठे सेक्टर-३६ येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेला उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

तेढ निर्माण करणाऱ्यांना खाली खेचा

। रोहा । प्रतिनिधी ।

जनता दहशतीच्या सावटाखाली आहे. म्हणून जाती धर्मात तेढ निर्माण करणाऱ्यांना सत्तेवरून खाली खेचा, असा हल्लाबोल अलिबाग-मुरुड आणि रोहा विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडी पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवार चित्रालेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी केला आहे. तसेच, अलिबाग मतदार संघाला निष्क्रिय आमदार मिळाला असल्याची टीका देखील त्यांनी आ. महेंद्र दळवी यांच्यावर केली आहे.

रोहा तालुक्यातील खैरे खुर्द गावात सोमवारी (दि.११) गाव बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या.

या बैठकीत जनतेला संबोधित करत असताना शेकाप उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी अनेक मुद्द्यांना हात घातला. त्या म्हणाल्या की, शेकाप, काँग्रेस आणि राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाने कधीच जाती धर्मात भेदभाव केलेला नाही. अशा परिस्थितीत या भागातील चिखलात कमळ उगवला तर आपल्यासाठी खूप मोठी धोक्याची घंटा आहे. निवडणुकीला सामोरे जात असताना सत्ताधारी भाजप आणि शिंदे यांच्या शिवसेनेकडे अजेंडा राहिलेला नाही. जाती धर्मात तेढ निर्माण करणे हाच त्यांचा धंदा आहे. तसेच, गद्दार आमदारांमुळे रायगड जिल्ह्याची अस्मिता धुळीस मिळाली असून अलिबाग मतदार संघाला दळवींच्या रूपाने एक निष्क्रीय लोकप्रतिनिधी मिळाला आहे. असे सांगत चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी चिंता व्यक्त केली आहे.

पुढे बोतलाना त्या म्हणाल्या की, तुम्ही चिंता करू नका. तुमच्या संरक्षणासाठी अद्याप शेकाप जिवंत आहे. अशा प्रसंगी मी स्वतः तुमच्या पाठीशी ठामपणे उभी राहीन. भाजपच्या मांडीवर जाऊन बसलेल्या आमदारांना घरी बसवा आणि येत्या २० तारखेला निवडणूक चिन्ह असलेल्या शिट्टीला मतदान करून मला तुमची सेवा करण्याची एक संधी द्या. निवडून आल्यानंतर तुमची सेवा करत असताना माझ्याकडून काही कसूर झाल्यास माझे कान पकडण्याचा अधिकार तुम्हाला आहे, असे आवाहन चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी केले आहे.

यावेळी ट्रस्ट अध्यक्ष अब्बास मुकादम, मुस्लिम जमात अध्यक्ष अजीम धनसे, उपसरपंच जुबेर धनसे, बशीर धनसे, वसीम धनसे, अस्लम पितु, मुखत्यार धनसे, ऐतीशाम मुकादम, गणेश मढवी, मनोज भायतांडेल, अनिल साळवकर, शंकर दिवकर, हेमंत ठाकूर आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'नारीशक्ती एकत्र आल्यावर इतिहास घडतो'

। महाड । प्रतिनिधी ।

महाड विधानसभा मतदारसंघातील शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या उमेदवार स्नेहल जगताप यांच्या प्रचारार्थ प्रभाग निहाय करण्यात येणाऱ्या प्रचार रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

प्रचारादरम्यान पुष्पलता जगताप, संध्या जगताप, विजया जगताप, शितल जगताप यांच्यासह अनेक महिला वर्गाने घरोघरी भेटी देत स्नेहल जगताप यांना विजयी करण्याचे आवाहन करत आहेत. गेल्या काही दिवसात या प्रचार फेरींना वाढता पाठिंबा मिळत असून जनाधार प्राप्त होत आहे. हीच विजयाची हमी, अशी प्रतिक्रिया शिवसेना महिला आघाडीच्या तृप्ती रत्नपारखी यांनी कृषीवलशी बोलताना व्यक्त केली आहे. महाड शहरातील प्रभात कॉलनी, वेताळवाडी, कुंभार आळी, वीरेश्वर मंदिर आदी परिसरात पुष्पलता जगताप यांच्यासह महिला आघाडीच्या प्रचार फेरीची आयोजन करण्यात आले होते.

यावेळी शिळीमकर, संजय चिखले, शिवसैनिक शिंदे, सुभाष शिवशिवकर, बंटी पोटफोडे, राजा सकपाळ, मयूर भुवड, नातेकर बंधू, रणजित नातेकर, सचिन शिंदे, बाबा शेडगे राजा मुळे, साहिल हेलेकर, नीता शेठ, तृप्ती रत्नपारखी, मनाली पोरे, पूजा जगताप आदी उपस्थित होते.

प्रचारार्थ सुरेश खैरे मैदानात

पाली/गोमाशी : पेण-सुधागड आणि रोहा विधानसभा मतदारसंघातील शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार अतुल म्हात्रे मैदानात उतरले आहेत. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेकाप नेते सुरेश खैरे यांनी गाव भेटीवर जोर दिला आहे. अतुल म्हात्रे यांना बहुमताने निवडून आणण्यासाठी शेकाप नेते सुरेश खैरे यांनी आपल्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन प्रचार मोहीम चालू केली आहे. यासाठी ते कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करीत आहेत.

चिकीखाऊ पंच नकोत

आता क्रिकेट सामन्यांसाठी सर्व देशात आंतरराष्ट्रीय पंच असतात. पूर्वी असे त्रयस्थ देशांचे पंच नसत. ज्या देशात सामने खेळवले जात त्या त्या देशांमधलेच पंच अम्पायरिंग करीत. त्यामुळे त्या त्या देशांचे पंच हे चिकीखाऊ असल्याचा आरोप होई. पाकिस्तानचे पंच त्यासाठी बदनाम होते. विशेषतः भारताविरुध्दच्या सामन्यांमध्ये ते हमखास पक्षपाती निर्णय देतात अशी टीका होत असे. याची आठवण होण्याचे कारण म्हणजे अलिकडच्या काळातील निवडणूक आयोग नावाच्या संस्थेची भूमिका. लोकसभा निवडणुकीच्या वेळी नरेंद्र मोदी जातीयवादी भाषणे करीत होते. काँग्रेस तुमचे मंगळसूत्र काढून अतिरेक्यांना- म्हणजे मुस्लिम समाजाला देईल असे सांगत होते. निवडणूक आयोगाने काहीही कारवाई केली नाही. मुळात मतदानासाठी अडीच महिने दिले. त्यातही मोदींना प्रचाराला वेळ मिळावा अशी सोय होती. तेव्हा महाराष्ट्रासारख्या राज्यांमध्ये पाच-सात फेऱ्या झाल्या. आता एका दिवसात मतदान होणार आहे. हरियाणा आणि महाराष्ट्राच्या निवडणुका एकत्र का घेण्यात आल्या नाहीत याचे कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण नाही. आता प्रचारातही अशीच उदाहरणे पुढे येत आहेत. उद्धव ठाकरे यांच्या हेलिकॉप्टरची लागोपाठ दोन दिवस झालेल्या तपासणीवरून वाद निर्माण झाला आहे. निवडणुकीच्या काळात आयोगाला वाहनांची अशी तपासणी करण्याचा अधिकार आहे व ती चांगलीच पध्दत आहे. या वाहनांमधून अनेकदा मतदारांना वाटण्यासाठी रोख रकमा किंवा अन्य सामग्री घेऊन जात असल्याचा संशय असतो. मात्र या संदर्भात केवळ विरोधी पक्षांच्या नेत्यांचीच ठरवून तपासणी होत असेल तर ते गैर आहे. शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनीही आपल्या ताफ्याची वारंवार तपासणी झाल्याचे म्हटले आहे. सत्तारुढ गटाचे मंत्री व नेते यांची अशीच झडती होते आहे का हा विरोधकांचा सवाल आहे. देवेंद्र फडणवीस व इतरांनी तशी तपासणी झाली असल्याचे म्हटले असले तरी ती किती वेळा व किती कसून झाली हे समोर आलेले नाही.

हे पैसे कोणाचे?

यात कोणताही पक्षपात नाही आणि सर्वच नेत्यांची नियमित तपासणी होत आहे असा खुलासा निवडणूक आयोगाने केला आहे. लोकसभेच्या वेळी केंद्रीय आयोगाने कोणत्याही आक्षेपांवर उत्तरे देण्याची तसदीही आयोगाने घेतली नव्हती. मतमोजणीच्या वेळी काही यंत्रांची बॅटरी एकदम कमी तर काहींची मोजणीनंतरही पूर्ण फुल असल्याचे काँग्रेसने निदर्शनाला आणले होते. अशा आक्षेपांचे तात्काळ निरसन होण्याची गरज होती. पण प्रत्यक्षात निवडणुका पार पडल्यानंतर एका पत्रकार परिषदेत आयुक्त त्याविषयी थोडक्यात बोलले. त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात सुधारणा आहे असेच म्हणायला हवे. अर्थात याही बातम्या केवळ सूत्रांच्या हवाल्याने प्रसिद्ध झाल्या आहेत. अधिकृत पत्रके काढलेली नाहीत. शिवाय त्यातही सर्वांच्या तपासण्या होत आहेत असे मोघम म्हटले आहे. त्याऐवजी, कोणाकोणाच्या किती व कशा तपासण्या झाल्या याचा तपशील दिला असता तर सध्याच्या वातावरणात बरे झाले असते. निवडणूक व्यवस्थेची विश्वासार्हता अधिक वाढली असती. निवडणूक आयोगाने पाचशे कोटींची रोख रक्कम जप्त केली आहे असाही एक उडत उडत खुलासा झाला आहे. पण या रकमेचे मालक कोण. यातल्या बेकायदा रकमेबाबत काय कारवाई झाली हे जाहीर झालेले नाही. हे नेहमीचेच आहे. दरवेळी निवडणुकीच्या दरम्यान गाड्यांमधून अमुक कोटी रोख रक्कम सापडली, तमुक किलो सोने सापडले अशा बातम्या येतात. पण त्याचे पुढे काय होते हे कधीच कळत नाही. वास्तविक निवडणुकीच्या काळात सर्व प्रशासकीय व पोलिसी यंत्रणा आयोगाच्या दिमतीला असतात. त्यांनी या प्रकरणांची तड लावण्याबाबत या यंत्रणेवर बडगा उगारायला हवा. पण बहुतेकदा ही प्रकरणे गुपचूप दडपली जातात. काही दिवसांपूर्वी पुण्याजवळ पाच कोटींची रोकड सापडली. ही गाडी शहाजीबापू पाटलांशी संबधित कार्यकर्त्याची होती असा आरोप झाला. पण या प्रकरणाचे पुढे काय झाले काहीही कळले नाही.

खेळ हवा, खेळखंडोबा नव्हे

उद्धव ठाकरे यांच्या त्राग्याबाबत काही जणांनी त्यांना दोष दिला आहे. आयोगाच्या अधिकाऱ्यांनी निर्भीडपणे काम केल्याबद्दल त्यांना शाबासकी द्यायला हवी होती असे या टीकाकारांनी म्हटले आहे. यातले आयोगाचे अधिकारी निर्भीड आहेत हे खरे. पण ते निःपक्ष आहेत काय हा खरा प्रश्न आहे. मोदी व शहा हे महाराष्ट्रभर सध्या घिरट्या घालत आहेत. त्यांच्या किंवा एकनाथ शिंदे यांच्या कितीदा व कशा तपासण्या झाल्या हे जनतेसमोर यायला हवे. भाजपने या संदर्भात देवेंद्रांच्या बॅगेच्या तपासणीचा व्हिडिओ प्रसृत केला आहे. तो पाहण्यासारखा आहे. ही तपासणी अत्यंत वरवरची आहे. लोकसभा निवडणुकीच्या काळात एकनाथ शिंदे वा त्यांच्या गटातील नेते प्रचाराच्या वेळी मोठाल्या बॅगा घेऊन हेलिकॉप्टरमधून उतरल्याचे व्हिडिओ व्हायरल झाले होते. त्यांची तपासणी झाल्याच्या कोणत्याही बातम्या नव्हत्या. मुद्दा या भेदभावाच्या वागणुकीचा आहे. दोन दिवसांपासून मोदी आणि शाह यांच्या दौऱ्यांमुळे त्या त्या शहरांतील लोकांना वेठीला धरण्यात येते. तेथील वाहतूक चार चार तास बंद ठेवली जाते. त्यांच्या विमानांच्या येण्याच्या काळात इतर नेत्यांच्या हेलिकॉप्टरना परवानगी दिली जात नाही. काल उद्धव ठाकरे यांना लातूरच्या दौऱ्यात असा फटका बसला. हा पक्षपात आहे. सर्व यंत्रणा भाजप आणि मोदींच्या सोयीने राबवल्या जाणार असतील तर नागरिकांच्या मनात अनेकविध शंका निर्माण होतात. तसे झाल्याने त्यांचा लोकशाही प्रक्रियेवरचा विश्वास उडण्याचा धोका असतो. आपल्याकडे मतदानाच्या प्रमाणात सतत घट होत आहे त्याचे एक कारण हेदेखील आहे. परवाच एक निवडणूक सर्वेक्षण प्रसिध्द झाले व त्यात महायुतीला बहुमत मिळेल असा दावा करण्यात आला. अशा सर्वेक्षणांना बंदी आहे. ही सर्वेक्षणे म्हणजे मतदारांना भुलवण्याचा प्रकार असतो. तरीही अशा सर्वेक्षणांवर काहीच कारवाई होत नसेल तर आयोगाला लोक आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणारच. खेळात हारजीत मान्य करता येऊ शकते. पण पंच जर चिकीखाऊ असतील तर तो खेळ खेळ उरत नाही. खेळखंडोबा होतो.

विचार

प्रसारमाध्यमांची दिशाहीनता लोकशाही समोरील यक्षप्रश्न

सुधीर दाणी

ज्या होकायंत्राच्या 'दिशा दर्शनाच्या' भरोशावर भर समुद्रातुन जहाज इप्सितस्थळी पोहचत असते ते होकायंत्रच जर दिशाहीन झाले तर त्या जहाजाचे भरकटणे अटळ असते. एवढेच कशाला पुन्हा योग्य दिशा मिळाली नाही तर त्या जहाजाला बुडण्याचा धोका देखील संभवतो. वर्तमानात लोकशाहीला दिशा देण्याची भूमिका बजावणारे होकायंत्र देखील दिशाहीन होताना दिसते आहे. ते होकायंत्र म्हणजे प्रसारमाध्यमे प्रसारमाध्यमांना लोकशाहीचे होकायंत्र म्हटले जाते, लोकशाहीचा चौथा स्तंभ संबोधले जाते यावरून लोकशाही व्यवस्थेतील प्रसारमाध्यमांचे महत्व किती अनन्य साधारण असते हे अधोरेखित होते.

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका जाहीर झाल्यापासून प्रिंट मीडिया व इलेक्ट्रॉनिक्स मीडियाचे वार्ताँकन डोळसपणे वाचले, डोळसपणे पाहिले -ऐकले तर ही गोष्ट अत्यंत प्रकर्षाने जाणवते की प्रसारमाध्यमे ही दिशा देण्याच्या मुलभूत कर्तव्यापासून भरकटलेले आहेत.

सर्वच वर्तमानपत्रातून मतदारसंघानिहाय वृत्तांकन केले जाते आहे. पण त्यात मतदारांच्या मूलभूत प्रश्न -समस्यांचे प्रतिबिंब ध्वनित होताना दिसत नाही. वृत्तांकन असते ते राजकीय कुरघोडी, मतदार संघातील जातीनिहाय मतांची आकडेवारी व तत्सम गोष्टी. इलेक्ट्रॉनिक्स मीडिया तर भरकटण्याच्या बाबतीत अधिकच 'आघाडी'वर असल्याचे दिसते. बहुतांश प्रेक्षकांची धारणा अशी झालेली आहे की, नको ते बातम्यांचे चॅनेल्स बंद करा. चॅनेल्सवरील राजकीय तमाशा, राजकीय कुरघोडी म्हणजेच लोकशाही, आरोप -प्रत्यारोप म्हणजेच राजकारण अशी धारणा माध्यमांची झालेली असल्याने व त्याच्या प्रसिद्धीस माध्यमांनी वाहून घेतलेले असल्याने एकूणातच राजकारणाचा स्तर घालवताना दिसतो आहे. लोकशाहीला दिशा देण्यापेक्षा तिला दिशाहीन करण्याच्या उद्दिष्टांबाबत प्रिंट मीडिया व इलेक्ट्रॉनिक्स मीडिया यांची 'युती' झालेली आहे की काय अशी शंका निर्माण होते आहे.

वस्तुतः प्रसारमाध्यमांनी केलेल्या वृत्तांकनातून मतदारांना योग्य व्यक्तीला मतदान करण्यासाठी मदत, दिशा मिळणे अभिप्रेत असते. प्रत्यक्षात मात्र दिशाहीन पद्धतीने केल्या जाणाऱ्या वृत्तांकनामुळे मतदारांमध्ये संभ्रमच होतो आहे. सर्वांना समान संधी या न्यायाने प्रसारमाध्यमांनी निवडणुक लढवणाऱ्या सर्वच उमेदवारांची परिपूर्ण माहिती मतदारांसमोर ठेवणे अपेक्षित असताना प्रसारमाध्यमे मात्र स्वतःच कोणत्याही शास्त्रशुद्ध अभ्यासाशिवाय कोण निवडून येण्याची शक्यता अधिक, कोणाचे पारडे जड यावर भाष्य करून अन्य उमेदवारांवर एक प्रकारे अन्यायच करत आहेत असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

सर्व प्रसारमाध्यमांनी मतदारांना योग्य उमेदवाराची निवड करणे सुलभ व्हावे यासाठी मतदारसंघ निहाय त्या त्या मतदारसंघातील सर्वच उमेदवारांची शैक्षणिक, उत्पनाचे साधन आणि आर्थिक परिस्थिती, सामाजिक, गुन्हेगारी पार्श्वभूमी, त्यांचे सामाजिक योगदान, मतदारसंघातील समस्या बाबत अभ्यास, पुढील ५ वर्षासाठीचे व्हिजन याची परिपूर्ण माहिती द्यायला हवी. फालतू कुरघोडीवर चर्चेचा धुराळा उडवण्यात धन्यता न मानता त्या वेळेचा सकारात्मक पद्धतीने विनियोग करावा. सर्वसामान्य नागरिकांच्या दृष्टीने एक गोष्ट आकलनापलीकडे आहे की, जी वर्तमानपत्रे आपल्या एक एक सेंमी जागेची किंमत अनमोल असल्याचे सांगतात, जी जी चॅनेल्स काही सेकंदाच्या जाहिरातींसाठी लाखो रुपये आकारतात तीच चॅनेल्स 'फालतू, वांझोट्या चर्चांवर' दिवस दिवस का दवडतात.

वर्तमानात लोकशाही समोरील सर्वाधिक धोका कोणता असेल तर तो म्हणजे प्रसारमाध्यमांची दिशाहीनता व त्यातून लोकशाहीचे होणारे अधःपतन लोकशाहीसाठी अत्यंत मारक ठरते आहे. निवडणूक कुठलीही असली तरी तिच्या निमित्ताने होणारा प्रचार हा मतदारांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्न, समस्या याच्याशी निगडित असणे अभिप्रेत असते. निवडणूक पूर्व प्रचारातून जनतेच्या समस्या-प्रश्न ऐरणीवर येणे अभिप्रेत असताना ना वर्तमान पत्रातून मी ना बातम्यांच्या वाहिनीवरून त्यांना वाचा फोडली जाते आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार, वीज, पाणी, ग्रामीण भागातील सरकारी शाळांची दुरावस्था, सरकारी दवाखान्यांची दुरावस्था, प्रती वर्षी लाखो रुपये खर्च करून देखील स्थानिक स्वराज्य संस्थांना ग्रामीण व शहरी भागात पायाभूत सुविधा पुरवण्यात येणारे अपयश, सरकारी यंत्रणांतील आकाशाला गवसणी घालणारा भ्रष्टाचार, आमदार -खासदार निधीला लागलेले टक्केवारीचे ग्रहण, नोकरशाहीच्या बदल्यातील भ्रष्टाचार, करोडो रुपये खर्च करून देखील वर्ष दोन वर्षात उखडणारे डांबरी -सिमेंटचे रस्ते, खाजगी शाळांची अनियंत्रित शुल्कवाढ, नियोजन पद्धतीने विकास न होता शहरांचा अनियंत्रित विस्तार, ट्रॅफिकची समस्या, गुप्त कारभार पद्धतीमुळे लोकशाहीला आलेले आभासी स्वरूप, निवडणुकीत होणारी वारेमाप पैशांची उधळपट्टी, लोकप्रतिनिधींची गुणोत्तरीय पद्धतीने वाढणारी संपत्ती, शेतकऱ्यांच्या मालाला मिळणारा कवडीमोल भाव, कृषीप्रधान देश असून देखील स्वातंत्र्याच्या ७७ वर्षानंतर देखील शेतीला शास्वत पाणी -वीजेची वानवा, टोलचा झोल असे अनंत प्रश्न समस्या आवासून समोर असताना इलेक्ट्रॉनिक्स चॅनेल्स वरील मुलाखतीत त्यावर एकही प्रश्न लोकप्रतिनिधींना विचारला जात नाही. चॅनेल्सवरील चर्चेत जनतेला भेडसावणाऱ्या या समस्यांना स्थान नसते. प्राधान्य दिले जाते ते 'ह्या नेत्याने काय म्हटले आणि त्या नेत्याने काय म्हटले' अशा अनावश्यक गोष्टींना हा प्रकार म्हणजे प्रसारमाध्यमांचे भरकटणे नव्हे तर दुसरे काय?

महाराष्ट्रातील मतदारांचे पुरोगामी महाराष्ट्रातील प्रिंट व इलेक्ट्रॉनिक्स मीडियाला आवाहन आहे की, लोकशाहीचा चौथा स्तंभ या भूमिकेला आपण खऱ्या अर्थाने 'न्याय देत आहात का?' यावर चिंतन करावे, आत्मपरीक्षण करावे. लोकशाहीला 'दिशा' देण्याचे कर्तव्य पार पाडणार नसाल तर किमान लोकशाहीला दिशाहीन करण्याचे पाप तरी किमान करू नका! प्रसारमाध्यमांनी रोकठोक -निर्भीड-भ्रष्टाचारावर प्रहार अशी बिरुदे मिरवताना ग्रामपंचायतीपासून ते राज्य -केंद्र सरकारच्या यंत्रणांचा गुप्त कारभार पद्धती ही भ्रष्टाचाराची जननी आहे व त्यामुळे सर्व लोकशाही यंत्रणाचा कारभार जनतेसाठी पब्लिक डोमेनवर खुला करा असा आग्रह सरकार समोर धरण्याचे धाडस दाखवावे अशी करदात्या नागरिकांची मागणी आहे .

अर्थातच वाचकांचे -प्रेक्षकांचे हे 'मत' प्रसारमाध्यमांना रुचणार नाही -पटणार नाही. अगदी मान्य ! कुठलाही व्यवसाय -उद्योग करण्यासाठी पैसा लागतो त्यामुळे काही तडजोडी अपरिहार्य असतात. पण याचा अर्थ तडजोड म्हणजेच व्यवसाय -उद्योग हि गोष्ट किमान प्रसारमाध्यमांकडून तरी अपेक्षित नाही. पण तरी देखील पुरोगामी महाराष्ट्रातील सर्व प्रिंट व इलेक्ट्रॉनिक्स मीडियाला सांगणे आहे की मतदारांना दिशा देण्याचे, लोकशाहीला बळकट करण्यासाठी लोकशाहीचा चौथा स्तंभ हि भूमिका आपण पार पाडतात का? यावर आत्मपरीक्षण करावे. वर्तमानात ज्या पद्धतीचे वृत्तांकन केले जाते आहे ते लोकशाहीचा चौथा स्तंभ या भूमिकेला न्याय देणारे आहे का ?

शेवटी... प्रसारमाध्यांनी हि गोष्ट लक्षात घ्यावी की अशाच प्रकारे विश्वासार्हतेला तडा जाणारे दिशाहीन वृत्तांकन -चर्चा -लेख सुरु राहिले तर आज ज्या प्रकारे कोणत्याच राजकीय पक्षावर, कोणत्याच नेत्यांवर मतदारांचा विश्वास उरलेला नाही तशीच अवस्था नजीकच्या भविष्यात प्रसार माध्यमांच्या बाबतीत देखील होऊ शकते. आणि तसे होणे हि लोकशाहीसाठी धोक्याची घंटा ठरू शकते हे नक्की.

आजकाल

बालपण हरवलेला 'बालदिन'

जगन घाणेकर

'लहानपण देगा देवा । मुंगी साखरेचा रवा ।। ऐरावत रत्न थोर । त्यासी अंकुशाचा मार ।। ज्याचे अंगी मोठेपण । तया यातना कठीण ।।' या एका अभंगात संत तुकाराम महाराजांनी लहानपणाची थोरवी वर्णिली आहे. अंगात मोठेपण आले कि त्याला अनेक समस्यांना सामोरे जावे यासाठी कोणतेही दायित्व नसलेले लहानपणच बरे हे त्याकाळी तुकाराम महाराजांनी सांगितले असले, तरी आजमितीला लहानपणच अधिक यातनादायी झाले आहे. देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मदिनाप्रीत्यर्थ साजरा होणारा बालदिन दरवर्षी शाळांमध्ये उत्साहाने साजरा होतो. बालकांच्या हक्काचा वर्षातील हा एकमेव दिवस असला,तरी आजच्या लहान मुलांची स्थिती पाहिल्यास त्यांचे बालपण कुठेतरी हरवत चालल्याचे लक्षात येते. विज्ञानाने जग प्रगतशील झाले असे म्हणतात; मात्र याच विज्ञानाने लाभलेल्या मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ गेम, केबल टीव्ही यांसारख्या साधनांनी मुलांना वेगळ्याच जगात नेले. मित्र मैत्रिणींसोबत मैदानी खेळ खेळण्याच्या, पालकांशी गप्पा मारून आपले विचार प्रकट करण्याच्या वयात मुले मोबाईलच्या आभासी जगामध्ये रमताना दिसत आहेत. ज्यामुळे हल्ली बालवयातच मुलांना नेत्रविकार, मनोविकार जडू लागले आहेत.

देशासाठी प्राणाचे बलिदान करणारे क्रांतिकारक, समाजसुधारक, राष्ट्रपुरुष हे आजच्या मुलांचे आदर्श नसून कार्टून जगतातील खोटी पात्रे मुलांना आपले आदर्श वाटू लागले आहेत. मुलांचे भवितव्य घडवण्याच्या हेतूने नोकरी व्यवसायासाठी घराबाहेर पडणारे आई बाबा मुलांना उमलत्या वयातच वेळ देत नसल्याने मुलांमधील त्यांच्याविषयीची प्रेम आणि आपुलकी कुठेतरी उणावू लागली आहे. त्यामुळे हल्लीची मुले पालकांना किंवा मोठ्यांना उलट उत्तरे देताना जराही विचार करत नाहीत. सातत्याने हिंस्त्र व्हिडीओ गेम्स, रिल्स पाहून लहान मुलांमध्येही मनोविकार, दोष वाढू लागले आहेत. सध्याच्या स्पर्धात्मक जगात आपल्या पाल्याचा निभाव लागावा म्हणून पालक त्यांना शाळेसोबत कोचिंग क्लासेस, प्रायव्हेट ट्युशन्सना घालत आहेत. हे कमी म्हणून कि काय त्याच्या जोडीला जिम्नॅस्टिक, स्पोर्ट्स, सिंगिंग, डान्स क्लासेसनाही मुलांना जावे लागत आहे. या सर्वांच्या ओझ्याखाली बालवयातच मुले राब-राब राबत आहेत. पालकांच्या अपेक्षांचे ओझे पेलताना मुलांचे बालपण मात्र हरवत चालले आहे.

गेल्या काही वर्षांत लहान मुलांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्येही कमालीची वाढ झाली आहे . या सर्वांचा परिणाम म्हणून बाल गुन्हेगारीचा आलेखही दिवसागणिक चढू लागला आहे. १०-१२ वर्षांची लहान मुले सुद्धा काही मनाविरुद्ध घडले, घरात कोणी उलट बोलले, अपमान केला किंवा परीक्षेत कमी गुण मिळाले म्हणून आत्म हत्येसारखा टोकाचा निर्णय घेऊ लागले आहेत. बालमजूर प्रतिबंधक कायदा अस्तित्वात असला तरी आज कितीतरी किराणा मालाच्या दुकानांत, चहाच्या टपरीवर, उपहारगृहांमध्ये, छोट्या कारखान्यांमध्ये लहान मुले राबताना दिसतात. सिग्नलवर, रेल्वे आणि बसेसमध्ये लहान मुलांकडून भीक मागून घेणे हाही एक व्यवसाय झाला आहे. मुलांचे हरवत चाललेले बालपण त्यांना पुन्हा मिळवून देण्याचे दायित्व नक्की कोणाचे? पालकांचे, समाजाचे कि सरकारचे ?

लोकसंसद

यंदाच्या निवडणुकीत हायटेक प्रचाराचा जोर!

महाराष्ट्राच्या पंधराव्या विधानसभेच्या निवडणुकीची तारीख जसजशी जवळ येत आहे तसतसा प्रचाराला वेग आला आहे. रस्त्यावरच्या 'ताई माई अक्का, विचार करा पक्का..' 'येऊन येऊन येणार कोण, अमुकतमुक शिवाय आहेच कोण..', 'अमुकतमुक तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है..' अशा सर्व पक्षीय कार्यकर्त्यांच्या पारंपरिक घोषणांनी सर्व आसंमत दुमदुमत असताना तिकडे सोशल मीडियावर, वृत्त वाहिन्यांवर निवडणुकीच्या प्रचाराला चांगलाच रंग चढला आहे. वृत्तवाहिन्यांवर विविध राजकीय पक्षांच्या जोशपूर्ण गाण्यांबरोबरच विविध योजनांच्या शॉर्ट क्लिपचा सातत्याने मारा केला जात आहे. तर व्हॉट्सअॅप, फेसबुक, इन्स्टाग्राम, युट्यूब अशा अनेक सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर उमेदवार 'स्वकर्तृत्वाच्या (!)' पोस्ट अपलोड करून मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. विशेष म्हणजे सध्याच्या 'रील'च्या जमान्यात अनेकांनी 'रील' मधून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न चालवला आहे. एक प्रकारे सोशल मीडियाच्या नव्या तंत्रज्ञानाने निवडणूक प्रचाराचे तंत्र बदलून टाकले असून सद्या स्थितीत ९० टक्के मतदारांच्या खिशात स्मार्ट फोन असल्यामुळे प्रचाराच्या इतर माध्यमांच्या तुलनेत यावर्षीच्या निवडणुकीत हायटेक प्रचार प्रभावी ठरणार आहे. - **प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

मराठी साहित्यिक दिनविशेष

१४ नोव्हेंबर

१९११ :- लेखिका इंदुमती चक्रधर देशमुख यांचा जन्म. ह्यांचा 'कमलगंध' हे कै. क. होस्पेट यांचे चरित्र, 'मेहरदिप्ती' हे संगीत नाटक, श्री रामकृष्ण परमहंसाचे तत्त्वज्ञान', 'शीला', 'अभ्रपटल' ही नाटके, अशी संपदा. **१९१९ :-** पत्रकार, संपादक अनंत काशिनाथ भालेराव यांचा जन्म. 'मराठवाडा'चे दैनिकात रुपांतर त्यांच्या कारकीर्दीत झाले. हैदराबाद मुक्तिसंग्रामातील सक्रिय सहभागाच्या आठवणी त्यांनी 'पेटलेले दिवस' या पुस्तकात नोंदविल्या. प्रवासातल्या निरीक्षणांच्या पुस्तकाला 'पळस गेला कोकणा' असे नाव दिले. 'आलो याचि कारणसी' हे त्यांनी पत्रकार म्हणून केलेल्या लेखनाचे संकलन त्यांच्या ह्यातीत, तर 'समग्र अनंत भालेराव'च्या दोन खंडांचे प्रकाशन अलिकडे झाले आहे. **१९२४:-** संगीत नाटक अकादमीचा पुरस्कारप्राप्त कथ्थक नृत्यांगना व नृत्यगुरु रोहिणी भाटे यांचा जन्म. त्यांचे नृत्यविषयक लिखाण संशोधनपर आणि लोकरुचिपर अशा दोन्ही प्रकारचे होते. 'लहजा' हे त्यांचे पुस्तक प्रकाशित झाले आहे. सन २००८ मध्ये त्या निवर्तल्या. **१९२६:-** कथा-कादंबरीकार विठ्ठल शंकर पारगावकर यांचा जन्म. 'बापूची वहिनी' ही त्यांची पहिली कथा. १०० हून अधिक कथा त्यांनी लिहिल्या. 'आविष्कार' व 'उजळली लेकरे' या संग्रहात त्यांच्या निवडक कथांचा समावेश. याशिवाय 'ललाट', 'निगुडा', 'पांढरी माती, गोंदण' या कादंबऱ्या तसेच चरित्र व राजकीय विषयांवरील पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९२६ :-** लेखक, पत्रकार, कथाकथनकार आणि पडद्यामागचे संपादक शंकर खंडू पाटील यांचा जन्म. 'इशारा', 'कुलवती', 'घुंगरू', 'बेइमान', 'सरपंच' या कादंबऱ्या आणि 'चोरा मी वंदिले', 'सवाल', 'सागराचं पाणी' हे कथासंग्रह अशी साहित्य संपदा. **१९२६ : -** लेखिका, अभिनेत्री शरयू परशुराम भोपटकर यांचा जन्म. 'पार्टी' ही स्त्रियांसाठी एकांकिका, तसेच 'प्रतिक्षा', 'मन:स्विनी', 'माझे दु:ख न जाणे कोणी', 'मेघा मोहोळ' ह्या कादंबऱ्या आणि 'रुतला गुलाब काटा' हा कथासंग्रह अशी साहित्य संपदा. **१९२७ :-** चित्रपट तसेच लघुकथा, कादंबरी लेखक श्रीपाद नाईक यांचा जन्म 'अन्याय', 'आघात', 'आदर्श' या लघुकथा आणि 'ओळख' ही लघुकादंबरी अशी साहित्य संपदा. १९३३ : - लेखक, पत्रकार सविता रामकृष्ण भावे यांचा जन्म. आयुर्विमा महामंडळाच्या योगक्षेम मासिकाच्या संपादनासह ह्यांचे 'काळापुढची चार पावले' हे शंतनुराव किर्लोस्कर, 'जिंकिले-भूमी-जल-आकाश' हे वालचंद हिराचंद, 'नाना : एक शिल्पकार' हे ता. ग. नारळकर आणि 'युगकर्ता हे लो. टिळकांचे चरित्र अशी साहित्य संपदा. **१९३६ :-** आयुर्वेद विषयक लेखन करणारे लेखक पेशाने डॉक्टर वासुदेव वामन भागवत यांचा जन्म. ह्यांचा 'आरोग्याकडे वाटचाल', 'चरकसंहिता', 'कामविज्ञान' अशी ग्रंथ संपदा प्रसिध्द. **१९३७ :-** नाटककार, कादंबरीकार वासुदेव निळकंठ आगटे यांचे निधन. वकील असणाऱ्या आगटयांनी 'संगीत पुंडलिक', 'संगीत गोपीचंद, संगीत दामाजी', 'संगीत महानंदा' ही पौरोणिक तर 'संगीत स्त्री साम्राज्य' हे काल्पनिक नाटक लिहिले. याशिवाय चिमुकला सरदार', 'नवकोट नारायण' या कादंबऱ्या तत्कालिन समाजाची अभिरुची लक्षात घेऊन त्यांनी आपल्या संगीत नाटकांची रचना केली. **१९४० :-** कवी दत्तात्रय सखाराम गांधी यांचा जन्म. 'मोर पिसारा', 'गंध प्रीतीचा' हे काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. **१९४० :-** नियतकालिकांतून लेखन करणारे माधव मुकुंद कामत यांचा जन्म. 'पाणंद' ही कथा त्यांची प्रकाशित झाली आहे. **१९४३ :-** कथालेखक, चरित्रकार बालसाहित्यिक पद्मजा शशिकांत फाटक यांचा जन्म. 'आवाजो', 'हॅपी नेटवर्क टू यू या पुस्तकातून 'अमेरिकन समाजातील १ घटस्फोट', 'कुमारीमाता', 'वृध्दांचे प्रश्न इ. समस्यांची चर्चा. याशिवाय 'सोनेलुमियेर व गर्भश्रीमंताचे झाड' हे ललित लेखसंग्रह. 'चिमुकली चांदणी', 'पैशाचे झाड' यासारख्या बालकथा, 'ताराबाई मोडकांचे चरित्र तसेच राही' हा कथासंग्रह आणि 'हसरी किडणी' हे अनुभव कथन अशी साहित्यसंपदा.

- **संजय वझरेकर**
९९७५५७६६७५

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१४ नोव्हेंबर

१) श्रीम. कांती कृष्णानंद नायक
अलिबाग, रायगड
१५-११-१९५१

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

स्व. सौ. कलावती भवानजी देढीया, स्मरणार्थ, महावीर ट्रेडर्स बाजार पेठ अलिबाग

रानडुकरांकडून भातपिकांचे नुकसान

शेतकऱ्यांवर पिकांची राखण करण्याची वेळ

। चिरनेर । प्रतिनिधी ।

यंदा परतीच्या पावसाने भात पिके तयार होण्याच्या अखेरच्या वेळेला दररोज सायंकाळच्या वेळेला बरसायला सुरुवात केल्याने भात पिके संकटात सापडली होती. आता पाऊस माघारी गेल्याने शेतकऱ्यांनी भात कापणी, बांधणी, झोडणीच्या कामाला सुरुवात केली आहे. मात्र शेतमजुरांच्या अभावी कापणीची कामे लांबवली आहेत. शेतमजूर वेळेवर मिळत नसल्यामुळे शेतकरी रडकुंडीला आला आहे. या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या भात पिकांवर आता जंगली रानडुकरे मोकाट गुरे आणि जंगली वानरांचा मुक्त संचार होत असल्यामुळे चिरनेर गावासह परिसरातील अन्य गावातील शेतकरी त्रस्त झाले आहेत.

या प्राण्यांची वक्रदृष्टी पडल्याने भात शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ लागले आहे. भातशेती कापणीला आली असताना, मजुरांच्या तुटवड्यामुळे शेतात रानडुकरांचा हैदोस सुरू झाला असल्याने शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले

आहे. येथील काही शेतकऱ्यांच्या भात पिकांची रानडुकरांनी एवढी नासाडी केली आहे की, ही भातपिके कापणी बांधणीच्या लायक राहिली नसल्यामुळे शेतकऱ्यांनी नासाडी झालेल्या भात पिकांची कापणीच केली नसल्याचे येथील शेतकरी कृष्णा म्हात्रे, दिनेश म्हात्रे यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास रानडुकरे आणि मोकाट गुरे हिरावून नेत असल्याने मोकाट गुरांचा व रानडुकरांचा वनविभागाने बंदोबस्त करावा, अशी मागणी उरण तालुक्यातील चिरनेर, कळंबुसरे, कोप्रोली, आवरे, साई, दिघाटी परिसरातील शेतकरी वर्गातून होत आहे. शेतकऱ्यांच्या शेताची नासधूस होऊन मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. याबाबत वनखाते, कृषी विभाग, पोलीस खाते तसेच स्थानिक ग्रामपंचायत प्रशासन यांच्याकडे वारंवार या प्राण्यांपासून नुकसान होत असल्याच्या लेखी तक्रारी करूनदेखील या सर्व खात्यांनी या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करून कित्येक वर्ष वेळ मारून नेली असल्याचे येथील शेतकऱ्यांनी सांगितले.

भाज्यांचे दर कडाडल्याने खिशाला कात्री

। महाड । प्रतिनिधी ।

गेली काही दिवस सातत्याने वाढत असलेल्या महागाईचा फटका सर्वामान्यांना बसत आहे. निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापले असताना, दुसरीकडे मात्र जीवनावश्यक वस्तूंचे दर गगनाला भिडले आहेत. दरदिवशी लागणाऱ्या भाज्यांच्या दरातदेखील कमालीची वाढ झाली आहे. भाजीचे दर ऐकून सामान्य माणसाने डोक्याला हात लावला आहे.

पेट्रोल आणि डिझेलचे दर दिवसेंदिवस वाढत आहेत. सद्यः स्थितीत पेट्रोलने शंभरी पार केली असल्याने या वाढत्या इंधन दराचा परिणाम सामान्य जनजीवनावर होत आहे. आधीच वाढलेली महागाई, वाढती बेरोजगारी याने हैराण असतनाच आता अचानक वाढत असलेल्या इंधन दरवाढीचा फटका सामान्य लोकांना बसत आहे. या इंधन दरवाढीने महाडमध्ये भाजीचे दरदेखील गगनाला भिडले आहेत. घरात लागणाऱ्या पालेभाज्या, फळभाजी घेणे कठीण बसले आहे. इंधन दर वाढीने ट्रान्सपोर्ट चे दर वाढले आहेत यामुळे बाहेरून येणाऱ्या भाज्या खरेदी करणे सर्वसामान्य नागरिकांच्या आवाक्यात नसल्याचे

> **भाज्यांचे दर दररोज वेगवेगळे असतातच, पण गेली काही दिवसात भाज्यांचे दर वाढल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे जागेवर वाढीव दराने भाजी खरेदी करावी लागत असल्याने आम्हालादेखील दर वाढवावे लागतात.**
> **– समीर गोठल, भाजी व्यावसायिक, महाड**

दिसून येत आहे. महाडमध्ये वाई, पाचगणी, भोर, पुणे आधी ठिकाणहून भाज्या येत असतात. दोन्ही मार्गावर घाटरस्ता असल्याने वाहतूक खर्च अधिक असला तरी पालेभाज्या आणि फळभाज्या एवढ्या लांबून येऊनदेखील आवाक्यात होत्या. मात्र, गेल्या काही दिवसांपासून भाज्यांचे दर प्रतिदिन वाढत असल्याचे चित्र दिसत आहेत.

महाडमध्ये सध्या भाज्यांचे दर गगनाला भिडल्याने भाजी घेणे सामान्य माणसाला कठीण झाले आहे. महाडमध्ये पालेभाज्यांची एक जुडी किमान ३० ते ४० पर्यंत आहे. यामध्ये माठाची एक जुडी ४० रुपये, शेपूची भाजीदेखील ४०, कांदा पात २५, टोमाटो ४० रुपये किलो, फरसबी जवळपास २०० रुपये किलो, भुईमुग ८० रुपये किलो तर मटार २४० रुपये किलो, सिमला मिरची १०० रुपये, गवार १०० रुपये किलो, मिरची ६० ते ८० रुपये किलो, तर मटार २०० किलो, शेवगा ३०० रुपये किलो, वांगी ८० रुपये किलो, कांदे ८०, कोथिंबीर ३० रुपये जुडी, पुदिना ३० रुपये जुडी असे दर ऐकण्यास मिळत आहेत.

रस्त्याचे काँक्रिटीकरण निकृष्ट दर्जाचे

। नेरळ । प्रतिनिधी ।

मुंबई-पुण्यातून कर्जत तालुक्यात येणाऱ्या महत्त्वाच्या चौक-कर्जत या राज्यमार्ग रस्त्याचे काँक्रिटीकरण मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून केले जात आहे. आठ किलोमीटर लांबीच्या रस्त्यासाठी साधारण ९० कोटी रुपये खर्च केले जात असून, या निधीमधून करण्यात येत असलेले काँक्रिटीकरण निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप भाजप किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष आणि भाजप प्रदेश

कार्यकारिणी सदस्य सुनील गोगटे यांनी केला आहे.

मुंबई आणि पुण्याकडे वाहने यांच्यासाठी कर्जत तालुक्यात येणार कर्जत-चौक हा महत्त्वाचा रस्ता आहे. या रस्त्याचे काँक्रिटीकरण काम एमएमआरडीएच्या माध्यमातून सुरू आहे. हे काम तब्बल ८७ करोड रुपयांचे असून, हे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याने कामाचा दर्जा ढासळला आहे, असा आरोप सुनील गोगटे यांनी केला आहे.

पान १ वरून

दोन तरुणी बेपत्ता

लैला शैलाश साळवी यांनी पोलिसांत मिसिंग तक्रार दाखल केली आहे. तर दुसऱ्या घटनेत चणेरा भागातील तळवडे येथील मानसी विनायक शिगवन (२३) ही दि. ४ नोव्हेंबर रोजी २.३० वा. सुमारास मुंबई पार्ले येथे जाण्यास निघाली. रोहा रेल्वे स्थानकातून रोहा दिवा पॅसेंजर गाडीत बसून गेली ती नियोजित ठिकाणी रवाना झाली असता अद्याप न पोहोचल्याने चुलत बहीण शुभांगी गणेश बाकाडे यांनी तक्रार दिली आहे. याबाबत पोलीस निरीक्षक देविदास मुपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हे.कॉ. नरेश मोरे पुढील तपास करीत आहेत.

राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडक कारवाई

केंद्र यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे. तसेच कोणत्याही प्रकारची अवैध मद्य वाहतूक होणार नाही. याकरिता रायगड विधानसभा मतदारसंघात शेडूंग, ता. पनवेल व चांढवे, ता. पोलादपूर येथे दोन तपासणी नाके उभारण्यात आले आहेत. या ठिकाणी संशयित वाहनांची सखोल तपासणी करण्यात येत आहे, तसेच अवैध मद्यविक्री करणारे ढाबे/हॉटेल/टपऱ्या यांच्यावर वारंवार कारवाई करण्यात येत असून, अशा हॉटेल/ढाबे मालक/चालक यांच्यासह जागा मालकांवर गुन्हे नोंद करण्याच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच या निवडणूक कालावधीत गोवा राज्यातून गोवानिर्मित मद्याची चोरटी वाहतूक रेल्वे प्रशासनाच्या रो-रो सेवेव्दारे वाहतूक होण्याची शक्यता असल्याने कोलाड येथे रो-रो रेल्वे सेवेव्दारे येणाऱ्या वाहनांची पोलीस विभाग व रेल्वे प्रशासन यांच्याशी समन्वय साधून तपासणी करण्यात येत आहे.

विधानसभा निवडणूक २०२४ मुक्त व निर्भयपणे पार पाडावी याकरिता विधानसभा मतदारसंघात मतदारांना दारुचे प्रलोभन देत असल्याचे निदर्शनास आल्यास तसेच अवैध मद्यनिर्मिती व विक्रीबाबत काही तक्रारी असल्यास या विभागाचा व्हॉट्सॲप क्र. ८४२२००११३३ व टोल फ्री क्र.१८००२३३९९९ वर संपर्क संपर्क साधावा, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक रविकिरण कोले यांनी केले आहे.

जनतेच्या पदरी वनवास

यावेळी सरपंच राजेंद्र मळेकर, संचालक गणेश मढवी, पाखर अण्णा, बाळाराम पाटील, वसंत गोरीवले, खारगाव ग्रा.पं. सदस्या शिल्पा नरेंद्र पाटील, मोरेश्वर गायकर, तुकाराम शिंदे, राजेंद्र आंबिलकर, रामचंद्र साळवकर, ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.मला अनेक जण सांगतात राजकारण म्हणजे पैशांचा खेळ आहे. पण, शेकाप निष्ठावंत कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. शेकापचा कार्यकर्ता कापला तरी बेईमान होणार नाही. ग्रामस्थ आणि कार्यकर्ते एकनिष्ठ, धाडसी आणि एक झेंड्याखाली असल्याने हीच पक्षाची मोठी ताकद असल्याच मतं चिऊताई पाटील यांनी व्यक्त केले. मी सावित्रीची लेक आहे, माझ्या डोक्यावर पाखर अण्णा आणि मळेकर काका यांच्यासारख्या ज्येष्ठांचा हात आणि जनतेची साथ आहे. त्यांच्या हिमतीवर आज सूनबाई म्हणून मी निवडणूक लढवतेय. तुमचे पाठबळ आणि ताकद माझ्या पाठीशी असल्यामुळे माझा विजयी निश्चित असल्याचा दावा चित्रलेखा पाटील यांनी केला आहे.

प्रीतम म्हात्रेंचे बालदींना प्रत्युत्तर

असता येत्या २३ तारखेला उरण विधानसभा मतदारसंघात शिट्टीचा आवाज घुमणार यात कोणतीच शंका नाही, हे तुम्हाला दिसेल. विरोधकांच्या पायाखालची वाळू घसरल्याने ते आमच्यावर बेताल आरोप करीत आहेत. यामध्ये दुसऱ्या मतदारसंघातील असल्याचा तसेच बापाच्या जीवावर उड्या मारतो, असे टीकास्त्र सोडले होते. त्यावेळी त्यांनी सांगितले की, उरण विधानसभा मतदारसंघात उरणबरोबर पनवेल, खालापूरमधीलही भाग येत आहे, मग त्यांनी या उमेदवारांना दुसऱ्या मतदारसंघातील असल्याचे म्हणायचे का, तसेच कोणताही मुलगा हा बापाच्याच जीवावर उड्या मारतो, त्यामुळे मी ही बापाच्या जीवावर उड्या मारतो, मग आपण कोणाच्या जीवावर उड्या मारता ते मतदारांना सांगावे, असा सवाल भाजपचे उमेदवार महेश बालदी यांना केला. यावेळी माजी सभापती सागर कडू, माजी उपसभापती वैशाली पाटील, महिला नेत्या सीमा घरत, काका पाटील, किरण घरत, नित्यानंद भोईर, निलेश पाटील आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते व तरुण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रचारात प्रीतम म्हात्रे यांना उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळत असल्याने ते नक्कीच निवडून येतील, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

चिऊताईंचाच बोलबाला

असे आश्वासन जनतेने गावभेटीदरम्यान दिले आहे. याचबरोबर इंडिया आघाडीच्या काँग्रेस आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या उपस्थित कार्यकर्त्यांनादेखील धन्यवाद देऊन पाठीशी असल्याबद्दल जयंत पाटील यांनी आभार व्यक्त केले. या सभेला महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी वाघोडे, पोयनाड, बांधण, पेझारी, चोरगोंडी, आंबेघर, चंदरवाडी परिसरातील प्रमुख कार्यकर्ते, निष्ठावंत अनुभवी तरुण, युवा कार्यकर्तेदेखील मोठ्या संख्येने हजर होते. यावेळी भाई जयंत पाटील, सुप्रिया पाटील, माजी पंचायत समिती सभापती बाळू पाटील, माजी सरपंच सतीश तरे, माजी सरपंच करण जैन, उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे सतीश उर्फ बंडू पाटील, सुनील पाटील, सुरेश म्हात्रे, आंबा बागायतदार चंद्रकांत मोकल यांच्यासह अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकाश म्हात्रे, संदेश पाटील यांनी केले.

मते मिळविण्यासाठी अंधश्रद्धेचा वापर

धाकटे बंधू चंद्रकांत गोगावले यांनी भरत गोगावले यांच्या सांगण्यावरून प्रचारसभेत मतदारांच्या मनात अंधश्रद्धा भेडसावण्याचा प्रयत्न केला. गोगावले यांच्याविरोधात मतदान केल्यास गावबहिरीला नवस करून शारीरिक अवयव दगावण्याची धमकी त्यांनी दिली. भरत गोगावले यांच्याविरोधात बुथ लावण्यात आल्यास जीवे ठार मारण्याची धमकीदेखील दिल्याचा आरोप पांगारे यांनी केला. ही बाब लोकशाहीविरोधी असून, संबंधितांविरोधात कारवाई करून आम्हाला संरक्षण देण्यात यावे, अशी मागणी व तक्रार अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे केला आहे. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी काय भूमिका घेणार याकडे लक्ष लागून राहिले आहे.

जत्रा बोंबल्या विठोबाची, बोंबाबोंब व्यापाऱ्यांची

विठोबाची जत्रा सुरु झाल्यानंतर लागोपाठ विविध तालुक्यांमध्ये जत्रा भरवल्या जातात. दिवाळीनंतर शेतातील पीक कापणीला गेल्यानंतर शेतकऱ्यांच्या कनवटीला चांगले पैस जमा झालेले असतात. त्यातून तो शेतकरी स्वतःसह कुटुंबाच्या मनोरंजनासाठी त्यातील पैसे जत्रेतील मौजमजेसाठी खर्च करतो. जत्रांमध्ये विविध तऱ्हेची दुकाने थाटण्यात येतात. त्यामुळे बारा बलुतेदार पद्धतीनुसार अर्थचक्राला गती प्राप्त होते. खोपोली येथील बोंबल्या विठोबाच्या जत्रेमध्ये दररोज लाखो रुपयांची उलाढाल होते. सदरची जत्रा १५ दिवस असल्याने हाच आकडा कोट्यवधी रुपयांच्या घरात जातो. त्यामुळे सर्वांसाठीच सदरची जत्रा अतिशय महत्त्वाची आहे.

जत्रेच्या हंगामातच विधानसभा निवडणूक होत आहे. त्यामुळे खोपोली येथील जत्रेमध्ये होणारी गर्दी, तेथे निर्माण होणारी कायदा व सुव्यवस्था पाहण्यासाठी पोलिसांची गरज असते. १२ नोव्हेंबरपासून जत्रेला प्रारंभ झाला असून, २६ नोव्हेंबरपर्यंत जत्रा सुरु राहणार आहे. याच कालावधीत २० नोव्हेंबर रोजी मतदान पक्रिया पार पडणार आहे. त्या अनुषंगाने सुरक्षितता, कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीकोनातून ताकई-खालापूर येथील १५ दिवस चालणारी सार्वजनिक यात्रा ही पोलीस मनुष्यबळाच्या व्यस्त दिनक्रमामुळे १९ व २० नोव्हेंबर या दोन दिवसांकरिता यात्रेच्या ठिकाणी केवळ दर्शन व्यवस्था सुरु ठेवून, अन्य प्रकारचे सर्व मनोरंजनाचे खेळ व दुकाने बंद करुन यात्रा भरविण्यात येणार असल्याचे जावळे यांनी मनाई आदेश जारी केला आहे.

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम घोषित केला आहे. या कार्यक्रमानुसार रायगड जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघामध्ये बुधवारी (दि.२०) मतदान प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. या विधानसभा मतदारसंघांच्या मतदार यादीत समाविष्ट असलेल्या प्रत्येक मतदाराला मतदान करता यावे, मतदाराला आपला मतदानाचा हक्क बजावता यावा याकरिता मतदान सुरळीतपणे पार पडणे आवश्यक आहे.

वर्षातून एकदा जत्रांचा हंगाम सुरु होतो. खोपोली येथील जत्रा ही छोटे-मोठे व्यावसायिक, दुकानदार, मनोरंजनाची साधणे असणाऱ्यांसाठी अतिशय महत्त्वाची असते. दररोज लाखो रुपयांची उलाढाल होते. व्यापारी, व्यावसायिकांसाठी ही आर्थिक पर्वणी असते. मतदानाच्या कालावधीत दोन दिवस बंदी असल्याने आर्थिक नुकसान होणार आहे. ठिकाणी जवळपास कोणतेही गाव नाही किंवा निवडणूक मतदानाचे केंद्र नाही असे असताना दुकानावरील बंदी चुकीची आहे असे दुकानदार संदीप फराड यांनी सांगितले.

आज आवासची यात्रा

थाटली जातात. त्यामुळे या परिसरात जत्रेचे स्वरूप निर्माण होते. यावर्षी आवासमधील यात्रा १४ नोव्हेंबर रोजी आहे. यात्रेनिमित्त बैलगाडीने जाऊन नागेश्वराचे दर्शन घेण्याची परंपरा आजही अबाधित आहे. भाविकांचा प्रवास सुखकर व आरामदायी व्हावा यासाठी अलिबाग एसटी बस आगार सज्ज झाला आहे. अलिबाग आगारातून आवासला जाणाऱ्या भाविकांसाठी १४ ज्यादा बसटी बसचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती देवरे यांनी दिली.

अजित पवार गटाला 'सर्वोच्च' दणका

शेअर केला होता. यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने आक्षेप घेतला आणि बुधवारी सुनावणीदरम्यान हा प्रकार सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनात आणून दिला.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने अमोल मिटकरी यांनी शेअर केलेल्या व्हिडीओ दाखला दिला. अजित पवार गट शरद पवारांचे फोटो, व्हिडीओ वापरत आहे. तसेच अजित पवार गटाचे घड्याळ चिन्ह गोठवले जावे आणि दुसरे चिन्ह त्यांना द्यावे, अशी मागणी करण्यात आली होती. यावर सर्वोच्च न्यायालयाने शरद पवार यांचे फोटो आणि व्हिडीओ वापरू नका, असे निर्देश दिले. शरद पवार हे स्वत: निवडणूक लढवत असून, जवळपास ३६ जागांवर अजित पवार गट आणि शरद पवार गटामध्ये लढत होत आहे. त्यामुळे कोण कुणाच्या बाजूने आणि कोण विरोधात हे लोकांना कळणार आहे. त्यामुळे अजित पवार गटाने उमेदवार आणि कार्यकर्त्यांसाठी एक इलेक्ट्रॉनिक पत्रक काढावे. त्यात शरद पवार यांचे जुने फोटो किंव व्हिडीओही वापरु नये, असे स्पष्ट करावे. तसेच विधानसभेला स्वतंत्र पक्ष म्हणून लढावे, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग यांचे कार्यालय
शुक्रतारा बिल्डींग, तळ मजला, सत्कार प्रेस समोर, अलिबाग जि. रायगड
दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल .ddr_rgd@rediffmail.com

जा.क्र.जिउनि/कात-१०/अपसेटप्रा.// जा. नो./२५२८/सन २०२४ दिनांक :११/११/२०२४

जाहीर नोटीस

अर्ज क्रमांक / २०२४

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम १०७(११) अन्वये नोटिस

वसुली अधिकारी,
रायगड जिल्हा मध्यवती सहकारी बँक लि. शाखा पेण अर्जदार
विरूध्द
१. श्री. देवेन अरुण यादव, गैरअर्जदार
पत्ता :- मु.२ मजला कौशल्य हिल प्लॉट नं. १६२ वरसोली ता. मावळ जि.पुणे
२. श्री.विजयकुमार रतनचंद जव्हेरी,
पत्ता:- मु.ए ७०४ पार्क वाकड जि.पुणे ४११०५७
३. श्री. वैभव विलास थोरवे,
पत्ता:- मु.पो.पोसरी ता.कर्जत जि. रायगड

अर्जदार संस्थेकडून कर्जदार / गैरअर्जदार यांनी घेतलेले कर्ज थकीत झालेमुळे सदर संस्थेने गैरअर्जदार यांचेविरूध्द प्राप्त केलेले महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ (१) अंतर्गत वसुलीचे प्रमाणपत्राची अंमलबजावणी अर्जदार संस्थेचे वसुली अधिकारी यांचे मार्फत करण्यात येत असून त्याकरीता संबंधित वसुली अधिकारी यांनी खालील मालमता जप्त करुन सदर मालमत्तेची जाहिर लिलावाने विक्री करणेसाठी सदर मालमत्तेचे मुल्य रक्कम ही वाजवी किंमत/अपसेट प्राईस रक्कम म्हणुन मान्यता देण्याचा प्रस्ताव या कार्यालयाकडे दाखल केला आहे.

अ. क्र.	मालमता मालकाचे नाव	मालमत्ता स्थळ	मालमता वर्णन/तपशिल	शासकीय दराने मुल्य	बाजारभाव दराने मूल्य	डीस्ट्रेस व्हॅल्यु
१.	श्री.देवेन अरुण यादव	मौजे पोसरी मालमत्ता ता. कर्जत, जि. रायगड	मौजे पोसरी,ता. कर्जत, जि.रायगड हद्दीतील गट नं. २८/८ अ, क्षेत्र ०-७४-९०	५७,१६,३४०/-	२,८२,१७,३५०/-	२,२५,७३,८८०/-

मालमत्ताधारक आणि त्यातील हितसंबंधी यांनी सदर रकमेस वाजवी किंमत/अपसेट प्राईस रक्कम म्हणुन मान्यता का देण्यात येवू नये? याबाबत प्रतिवादी यांना म्हणणे मांडण्यासाठी दि.०८/१०/२०२४ व २४/१०/२०२४ रोजी ठेवण्यात आली होती मात्र सदर सुनावणीस कर्जदार व जामिनदार हजर नराहिल्याने नैसर्गीक न्यायतत्वानुसार त्यांना पुन्हा एकदा संधी देण्यात येत तरी त्यांनी आपले म्हणणे मांडण्यासाठी निम्नस्वाक्षरीकार यांचे समोर दिनांक २६/११/२०२४ रोजी दु.१२.०० वा. आवश्यक पुराव्यासह उपस्थित रहावे. अन्यथा आपले काहीही म्हणणे नाही असा निष्कर्ष नोंदवून आपले गैरहजेरीत सुनावणी कामकाज पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग
दिनांक :- ११/११/२०२४

सही/-
(प्र.का. जगताप)
जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, रायगड-अलिबाग

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग यांचे कार्यालय
शुक्रतारा बिल्डींग, तळ मजला, सत्कार प्रेस समोर, अलिबाग जि. रायगड
दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल ddr_rgd@rediffmail.com

जा.क्र. जिउनि/कात-१०/अपसेटप्रा./ /जा. नो. २५२७/सन २०२४ दिनांक ११/११/२०२४

जाहीर नोटीस

अर्ज क्रमांक /२०२४

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम १०७(११) अन्वये नोटिस

वसुली अधिकारी,
रायगड जिल्हा मध्यवती सहकारी बँक लि. शाखा पेण ... अर्जदार
विरूद्ध
१. श्री. राकेश कृष्णा म्हात्रे, ... गैरअर्जदार
पत्ता :- मु.काश्मिरे पो.कांदळे ता. पेण, जि. रायगड
२. श्री. सुनिल प्रल्हाद धामणकर,
पत्ता:- मु.धामणकर निवास रामवाडी ता. पेण, जि. रायगड
३. श्री. राजेश जनार्दन पाटील,
पत्ता:- मु.रोड पो. कादळेपाडा ता. पेण, जि. रायगड

अर्जदार संस्थेकडून कर्जदार / गैरअर्जदार यांनी घेतलेले कर्ज थकीत झालेमुळे सदर संस्थेने गैरअर्जदार यांचेविरूद्ध प्राप्त केलेले महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ (१) अंतर्गत वसुलीचे प्रमाणपत्राची अंमलबजावणी अर्जदार संस्थेचे वसुली अधिकारी यांचे मार्फत करण्यात येत असून त्याकरीता संबंधित वसुली अधिकारी यांनी खालील मालमता जप्त करुन सदर मालमत्तेची जाहिर लिलावाने विक्री करणेसाठी सदर मालमत्तेचे मुल्य रक्कम ही वाजवी किंमत/अपसेट प्राईस रक्कम म्हणुन मान्यता देण्याचा प्रस्ताव या कार्यालयाकडे दाखल केला आहे.

अ. क्र.	मालमता मालकाचे नाव	मालमत्ता स्थळ	मालमता वर्णन/ तपशिल	शासकीय दराने मूल्य	बाजारभाव दराने मूल्य	डीस्ट्रेस व्हॅल्यू
१.	श्री. राकेश कृष्णा म्हात्रे	मौजे मळेघर ता. पेण जि. रायगड हद्दीतील मालमत्ता	मौजे ग्रुप ग्रामपंचायत मळेघर, ता. पेण,जि. रायगड हद्दीतील मालमत्ता क्र. २०४ बी, क्षेत्र ७२६ चौ. फूट हे जुने घर मोडून नव्याने बांधकाम करीत असलेले घर	१४,७२,८०३/-	८,७१,०००/-	६,९६,९६०/-

मालमत्ताधारक आणि त्यातील हितसंबंधी यांनी सदर रकमेस वाजवी किंमत/अपसेट प्राईस रक्कम म्हणुन मान्यता का देण्यात येवू नये? याबाबत प्रतिवादी यांना म्हणणे मांडण्यासाठी दि.०८/१०/२०२४ व २४/१०/२०२४ रोजी ठेवण्यात आली होती मात्र सदर सुनावणीस कर्जदार व जामिनदार हजर न राहिल्याने नैसर्गीक न्यायतत्वानुसार त्यांना पुन्हा एकदा संधी देण्यात येत तरी त्यांनी आपले म्हणणे मांडण्यासाठी निम्नस्वाक्षरीकार यांचे समोर दिनांक २६/११/२०२४ रोजी दु.१२.०० वा. आवश्यक पुराव्यासह उपस्थित रहावे अन्यथा आपले काहीही म्हणणे नाही असा निष्कर्ष नोंदवून आपले गैरहजेरीत सुनावणी कामकाज पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग
दिनांक :- ११/११/२०२४

सही/-
(प्र. का. जगताप)
जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, रायगड-अलिबाग

बांधण

कामार्ले

किहीम

गुंजीस खालचापाडा

कुरूळ

परहूर

गुंजीस

शास्त्रीनगर नागांव

श्रीगांव

पोयनाड

थेरोंडा बाजारपेठ

कामत

भातसई-रोहा

वरंडे

प्रीतम म्हात्रे यांना उदंड प्रतिसाद

उरण : उरण विधानसभा मतदार संघातील शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांचे पाणजे-बोकडविरा गावात प्रचार दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांचे फटाक्याच्या आतषबाजीत उत्स्फुर्त स्वागत करण्यात आले. बोकडविरा येथील प्रचारादरम्यान प्रीतम म्हात्रे यांना मोठा प्रतिसाद मिळाला. फुंडे सरपंच बिलालाशेठ यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी गावातून प्रचार फेरी काढली होती. यावेळी घराघरातून प्रीतम म्हात्रे यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. तसेच, गाव भेट दौऱ्याला देखील नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला. यावेळी 'अबकी बार, प्रीतम म्हात्रे आमदार' या घोषणांनी आणि निवडणूक चिन्ह असलेल्या शिट्टीच्या आवाजाने परिसर दुमदुमून गेला होता. यावेळी महादेव, बंडाशेठ यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

मतदान जनजागृती प्रभातफेरी

रसायनी : नागरिकांनी आपला मतदानाचा अधिकार कर्तव्य भावनेने बजवावा यासाठी मतदार जागरुकता आणि सहभाग कार्यक्रम अर्थात स्वीप अंतर्गत उरण विधानसभा मतदारसंघातल्या वासांबे मोहोपाडा येथील कांबे राजिप शाळेतील विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृती प्रभातफेरी काढून मतदान करावे, असे आवाहन करण्यात आले. यावेळी घरोघरी जाऊन विद्यार्थ्यांकडून पालकांना पत्र देऊन जनजागृती करण्यात आली. तसेच, निबंध स्पर्धाही घेण्यात आल्या. यावेळी मुख्याध्यापक पुंडलिक पाटील, शिक्षक शहाजी घायतिडक, शुभांगी भंडारकर, जागृती तेलंगे, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी नागरिकांना मतदानाचा अधिकार बजावण्याबाबत उद्बबोधन केले.

मतदारांचा विश्वास सार्थ ठरवू : प्रीतम म्हात्रे

। उरण । प्रतिनिधी ।

उरण विधानसभा मतदारसंघात विद्यमान आमदाराच्या नाकर्ते पणामुळे तालुक्याचा विकास रखडला असून या तालुक्याला पुन्हा विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी मतदाराचा विश्वास सार्थ ठरवू, असे प्रतिपादन उरण विधानसभा मतदार संघातीली शेकापचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांनी केले आहे. विधानसभा निवडणूक प्रचारार्थ पागोटे येथे प्रचारफेरीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

यावेळी बोलताना प्रीतम म्हात्रे म्हणाले की, पागोटे क्रातीवीरांची भुमी आहे. मात्र, या भुमीतील नागरीकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. उरणच्या विद्यमान आमदारांचे या समस्यांकडे दुर्लक्ष झाले आहे. गेल्या पाच वर्षात ते इकडे फिरकले देखील नाहीत. यानंतर आता निवडणुक समोर दिसताच त्यांनी थापा मारण्यास सुरूवात केली आहे. ते रस्त्याबद्दल बोलत नाहीत, पाण्या बद्दल बोलत नाहीत. येथील आगरी, कोळी समाजाच्या समस्यांबद्दल बोलत नाहीत. तर, अटल सेतू बद्दल बोलतात. आगरी, कोळी समाजाचा अवमान होईल, असे ते बोलतात. यामुळे या निवडणुकीत शिट्टी या चिन्हापुढील बटण दाबून मला विजयी करा, असे आवाहन प्रीतम म्हात्रे यांनी केले आहे.

यावेळी बंडाशेठ, जितेंद्र म्हात्रे, रमाकांत म्हात्रे, शिपाजी काळे, महेश साळुंखे आणि शेकाप कार्यकर्ते उपस्थित होते.

तरूणाई प्रीतम म्हात्रेंच्या पाठीशी

। उरण । प्रतिनिधी ।

निवडणुकीची रणधुमाळी आता चांगलीच रंगात आली असून शेकापचे उरण विधानसभेचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांच्या पाठीशी पूर्ण तरूणाई ताकदीनिशी एकवटली आहे.

उरण विधानसभा मतदार संघाचे शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांनी प्रचार रॅलीच्या निमीत्ताने पागोटे, वेश्वी, दादरपाडा, फुंडे, बोकडविरा, करंजा, न्हावाशेवा गावाचा झंझावाती दौरा केला. या दौऱ्यात प्रितम म्हात्रे यांच्यासाठी स्वत:ला प्रचाराच्या कामात झोकून दिलेल्या तरूणाईमुळे प्रचारात वेगळीच रंगत आली असून शेकापची हवा निर्माण झाली आहे. प्रीतम म्हात्रे यांनी या भागात घेतलेल्या आघाडीमुळे सर्वत्र जल्लोशपूर्ण वातावरण तयार झाले आहे. दरम्यान, उरणच्या विद्यमान आमदारांनी गेल्या पाच वर्षात तालुक्याच्या प्रश्नाकडे लक्ष न देता आमदारकीचा वापर केवळ स्वत:ची तिजोरी भरण्यासाठीच केल्याने जनता त्यांच्यावर नाराज आहेत. अशा बिनकामी आमदाराला घरी बसवून तालुक्याचा विकास साधण्यासाठी अवघी तरूणाई प्रीतम म्हात्रे यांच्यामागे एकवटली आहे.

पक्ष प्रवेश परिवर्तनची नांदी : स्नेहल जगताप

। महाड । प्रतिनिधी ।

महाड विधानसभा मतदार संघात होणारे पक्ष प्रवेश हे ऊर्जा देणारे व भविष्यातील परिवर्तनाची नांदी असल्याचे मत शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या उमेदवार स्नेहल जगताप यांनी काथे आदिवासीवाडी येथील पक्ष प्रवेश दरम्यान व्यक्त केले.

यावेळी बोलताना स्नेहल जगताप म्हणाल्या की, गेली १५ वर्षे येथील वाड्या आ. गोगावले यांच्या पाठीशी ठामपणे उभ्या होत्या. मात्र, त्यांच्याकडे दुर्लक्ष केल्यामूळे अनेक गावं आज शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षात प्रवेश करत आहेत. यामुळे वेगळीच ऊर्जा मिळत आहे. तुमची आमची मशाल विधानसभेत पाठवायची आहे. तसेच, भविष्यात सर्वांनी एकत्र येत विकास साधायचा असल्याचा विश्वास स्नेहल जगताप यांनी व्यक्त केला आहे.

महाड काथेची आदिवासी वाडीत ४०० मतदानर आहेत. मात्र, आज निवडणूका तोंडावर आल्याने आमदार गोगावले यांना आमची गरज भासली आहे. यावेळी स्नेहल जगताप यांना जास्तीत जास्त मतदान करूप विधानसभेत पाठवून आमदारांना त्यांची जागा दाखवून देऊ. असा निर्धार रमेश हिलम यांच्यासह आदिवासी बंधू व भगिनी यांनी पक्ष प्रवेश करताना केला आहे.

यावेळी माजी उपसभापती तुकाराम सुतार, उपतालुका प्रमुख चंद्रकांत पवार, अनिल मोरे, संदीप जाधव, शिवानी म्हामुणकर, विद्या नलावडे, सुनील आदींसह गावातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तूप गावातील भाजपला खिंडार

। उरण । वार्ताहर ।

उरण विधानसभा मतदारसंघाचे शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून तूपगावातील भाजपच्या कार्यकर्त्यांनी शेकापमध्ये जाहीर प्रवेश केला आहे.

प्रीतम म्हात्रे यांच्या प्रचाराने वेग घेतला असून ठीक ठिकाणी त्यांच्या प्रचाराच्या रॅलीचे स्वागत केले जात आहे. प्रीतम म्हात्रे यांना विजयी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते इतर पक्षातून शेकापमध्ये जाहीर प्रवेश करीत आहेत. यातच तूपगावातील भाजपचे कार्यकर्ता सचिन साळवी , निखिल साळवी, प्रतिक साळवी, प्रथमेश साळवी, नंदकुमार साळवी, सुमित महप्रलकर, किशोर कुंभार, सुरेंद्र कुंभार, सिद्धेश थळकर, गणेश ठाकरे, सनी ठाकरे, सुनिल कांबळे, संदेश साळवी यांनी प्रीतम म्हात्रे यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून शेकापमध्ये जाहीर प्रवेश केला आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- प्रथम पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८९३५७७५
- नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे . अकाऊंटंट (पेमेंट - १२०००) हाऊस कीपर (पेमेंट- ९५००) रिसेप्शन (पेमेंट - १२०००) १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसॲप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- Design Metrics is Hiring. Need a Draftsman/ Sit Supervisor at our Studio in Alibag. Skills required - Autocad / Site knowledge. Kindly share your CV on designmetricsoffice@gmail.com. Contact No - 9970051876
- भारतगैस वितरक मे.जे.बी.जगे ॲण्ड सन्स्, अलिबाग फुलटाईम/ पार्ट टाईम कामासाठी मुले पाहिजेत संपर्क - ९३५९८८५६७६
- गाळा भाड्याने देणे आहे. पी.एन.पी.मध्ये कलावती भाजी भंडारच्या बाजूला, अलिबाग संपर्क : ७३०४८५२३१५/९६०४१३८८२६
- सन स्टोन रीयल इस्टेट, साईना कॉम्प्लेक्स, चर्चच्यासमोर(ऑफीस, अलिबाग व आजुबाजुच्या गावामध्ये N.A.Plat बागायती प्लॉट भातशेती खरेदी व विक्री. संपर्क :८६६९००६९०२/९२७०८८८८०३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२९०/ २२२७६१

●अलिबाग तालुक्यातील परहूरपाडा येथील राजिप शाळा श्रीगांव आदिवासी वाडी केंद्रात सोमवारी (दि.११) मतदार जागृती विषयक चित्रकला स्पर्धेचे आयोजन, तसेच मंगळवारी (दि.१२)मानवी साखळी बनवून मतदार जागृती केली.

● महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने स्वीप मतदार जनजागृती कार्यक्रम अंतर्गत गोंधळपाडा येथील रा.जि.प. शाळेत विविध कार्यक्रम राबविण्यात आले होते. यावेळी मतदारा जनजागृती विषयक चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, मानवी साखळी, पथनाट्य तसेच घोषवाक्य असे विविध उपकर्म राबविण्यात आले. या उपक्रमात शाळेतील सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग घेतला होता.

● जसखार गावातील भाजपचे ग्रामपंचायत सदस्य सचिन घरत आणि अनेक कार्यकर्त्यांनी प्रीतम म्हात्रे यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला.

●जसखार गावातील शिवसेना (ठाकरे) पक्षाचे ग्रामपंचायत सदस्य राकेश तांडेल व ग्रामसुधारणा मंडळाचे सेक्रेटरी मनोज ठाकूर यांनी शेकापचे उरण विधानसभेचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांना पाठिंबा दिला आहे.

● आकुलवाडी गावातील भाजप पक्षातील निष्ठावंत कार्यकर्ते निलेश जाधव, कैलास मोरे, सागर रामगुडे, विशाल मोरे, दीपक मांडवकर, यांनी शेकापचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून शेतकरी कामगार पक्षात जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे भाजपला आकुलवाडी मध्ये खिंडार पडले आहे.

● उरण विधानसभेचे शेकापचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून सावरखार येथील उरणचे युवा तरुण मयूर घरत, शुभम घरत, नितीन पाटील, विकी घरत, ऋषिकेश घरत, निलेश घरत, राज ठाकूर, रोहित आहिरवाड, सुमित ठाकूर यांनी शेतकरी कामगार पक्षात जाहीर प्रवेश केला आहे.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनांची कामे बारगळली

पाच्छापूर ग्रामपंचायतीचे कार्यकारी अभियंत्यांना पत्र

। पाली । वार्ताहर ।

सुधागड तालुक्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत चालू असलेल्या रस्त्यांची कामे खितपत पडली असल्याने नागरिकांच्या वाहतुकीसाठीच्या अडचणी वाढल्या आहेत. याबाबत ग्रुप ग्रामपंचायत पाच्छापूर यांच्या वतीने पाच्छापूर फाटा ते दर्यागावपर्यंतच्या रस्त्याचे काम हे धीम्या गतीने किंबहुना बंदच असल्याबाबतचे तक्रारी अर्ज मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे कार्यकारी अभियंता यांना दिले आहे.

विधानसभेची रणधुमाळी चालू आहे. आपल्या प्रचारात अनेक नेते, उमेदवार लोकांसमोर विकासाच्या बढाया मारत आहेत. आपल्या मतदारसंघात चांगले रस्ते, वीज, पाणी या मूलभूत गरजा नागरिकांना देण्याचे आश्वासन देऊन मतांची

भीक मागत आहेत. मात्र, प्रत्यक्षात या सर्व गोष्टी बोलण्यापुरताच की काय, अशी भावना येथील नागरिक व्यक्त करीत आहेत. अशीच अवस्था पाच्छापूर ग्रामपंचायत व वाघोशी ग्रामपंचात हद्दीत झाली आहे. गेल्या वर्षभरापासून भेरव ते कामथेकरवाडी व पाच्छापूर फाटा ते दर्यागाव या मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील रस्त्याचे काम खितपत पडले आहे. या दोन्हीही मार्गांचे काम वर्षभरापूर्वी चालू झाले आहे. सुरुवातीला रस्त्याचे काम जलदगतीने चालू होते. मात्र, त्यानंतर ते कासवगतीवर आले. ऐन पावसाळ्यात रस्त्याचे काम हे अर्धवट ठेवण्यात आले. त्यामुळे प्रवासी, विद्यार्थी, गरोदर महिला, वृद्धांना २-४ किमी मैलांचा प्रवास चिखलातून पायी करावा लागला.

पावसाळ्यात त्या चिखलातून मोटारसायकल स्वार घसरून पडले, तर चारचाकी व अवजड वाहने चिखलात रुतुन बंद पडली. तरीदेखील ठेकेदाराला जाग आली नाही.

आली लग्न घटी, शुभमंगल सावधान!

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

कोकणात तुळशीच्या लग्नाची आणि पावसाने ओढ दिल्याने भातकापणीची त्यातच विधानसभेच्या निवडणुका तोंडावर आल्याने डोअर टू डोअर स्थानिक कार्यकर्त्यांसह सर्व उमेदवारांच्या प्रचाराची धामधूम मोठ्या उत्साहात सुरू आहे. तर, एकीकडे तुळशीच्या लग्नाची धामधूम सुरू झाली आहे.

कार्तिकी एकादशीनंतर दुसऱ्या दिवसापासून त्रिपुरारी पौर्णिमेपर्यंत होईपर्यंत शहरातील आळी आळीतून तर गावा गावात विवाहाचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. याकरिता काही ठिकाणी पारंपरिक वृंदावन मातीने तयार करुन तर नव्या युगातील सिमेंटच्या तुळसी वृंदावनाला रंगरंगोटी करण्याची लगबग पहावयास मिळत आहे.

जाहीर नोटीस

अलिबाग येथील मा. दिवाणी न्यायालय यांच्या समोर क.स्तर
जिल्हा रायगड

रे. मु. क्र. २४/२०२०

श्री. हरिश्चंद्र मोरू पेणकर
राहणार : घर नं. ९९८ क, चौल दक्षिण भाग
मु.पो.चौल, ता.अलिबाग जि.रायगड — वादी

वि

श्रीमती यमनी पोशा गायकवाड
राहणार : चौल, ता अलिबाग, जि. रायगड — प्र. वादी

वरील वादी यांनी प्र.वादी विरूद्ध दावा हक्क प्रस्थापनाकरिता मा. न्यायालयाचे अधिकाराकरिता स्पेसिफिक रिलीफ ॲक्ट कलम ३४ व ३८ प्रमाणे अर्ज केला. वादी हे चौल दक्षिण भाग ग्रुप ग्रामपंचायत चौल ग्रामपंचायत घर नं. ९९८ क येथील कायमचे रहिवासी असुन वादी यांचा जन्म चौल येथे झाला. वादीचे मालकीची व खुद्द ताबेकब्जा वहिवाटीची खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नं.	क्षेत्र हे.आर	आकार रू. पैसे
चौल उ.भाग ता.अलिबाग	२६६४ (जुन सर्व्हे नं. ७०६/३)	०-००-७६	१-५२

वरील नमुद प्र. वादी श्रीमती यमनी पोशा गायकवाड यांचे निधन खुप वर्षापूर्वी झाले आहे. अद्यापपर्यंत प्र.वादी तर्फे कोणीही वारस मे. न्यायालयात हजर झाले नाहीत. प्र.वादी यांचे वारस आहेत असे समजल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासुन एक महिन्याच्या आत कोर्टात हजर राहुन हरकती कळवाव्या. तसेच योग्य मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखवल्यास तर सदरहु कोर्ट या वादी बद्दल लागलीस पुरावा घेऊन त्याचा हक्क साबित दिसल्यास सदरहु मिळकती बाबतीत हक्क प्रस्थापित करतील.

दिनांक :
अलिबाग

हुकुमावरून
अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर
अलिबाग

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

तरुणाची विकट गडावरून सुखरूप सुटका

शिवगर्जना ग्रुप मदतीला आला धावून

। माथेरान । वार्ताहर ।

माथेरानजवळील विकट गडावर जालना येथून आलेला तरुण वाट चुकला होता. यावेळी नेरळ फणसवाडी येथील शिवगर्जना ग्रुप पुन्हा एकदा मदतीला धावला आहे. ग्रुपच्या सदस्यांकडून या तरुणाची सुखरूप सुटका करण्यात आली आहे. हा तरुण एकटाच माथेरान विकट गड येथे ट्रेकिंगसाठी आला होता. मात्र, घनदाट जंगलातून पुन्हा घरी परतत असताना हा तरुण वाट हरवून बसल्याने गडावर रात्री अडकून पडला. ही माहिती नेरळ पोलिसांना मिळताच पोलिसांनी स्थानिक फणसवाडी येथील शिवगर्जना ग्रुपला पाचारण केले.

जालना जिल्ह्यातील राहणारा तरुण नेरळ येथून माथेरानजवळील विकट गडावर जाण्यासाठी शनिवारी (दि. ९) सकाळी आला होता. गडाबाबत माहिती नसतानादेखील हा तरुण ट्रेकर्स एकटाच स्थानिक ग्रामस्थांकडून माहिती घेत गडावर पोहोचला. परंतु तो परतीच्या प्रवासात पायवाट हरवून बसला. त्यामुळे घरी जाण्यासाठी हा तरुण मार्ग शोधत असताना घनदाट जंगलात अडकून पडला. दरम्यान, तरुणाने पोलीस हेल्पलाईन नंबरवरून पोलिसांची मदत मिळवण्याचा प्रयत्न केला. यावेळी स्थानिक नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी शिवाजी ढवळे आणि त्यांचे पोलीस पथक विकट गडाच्या पायथ्याला असणाऱ्या फणसवाडी गावात पोहोचले. स्थानिक शिवगर्जना ग्रुपमधील तरुणांच्या मदतीने तरुणाचा शोध घेतला. हा तरुण गडाच्या वाटेवर अडकून पडल्याने त्याला वाट सापडून येत नव्हती. मात्र स्थानिक तरुणांना गडाची पूर्ण माहिती असल्याने या तरुणाला रात्री १२ वाजता सुखरूप गडाखाली आणण्यात आले.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे कोठिंबे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. विनोद बाळाराम म्हसे यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

सर्व्हे क्र.	हिस्सा क्र.	क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार (रू.पै.)
९३	३	०-०४-८०	०-०५
९३	४	०-०३-८०	०-३०
९३	५ ब	०-०६-८०	०-०५

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : १४/११/२०२४ — **ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफिस - कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमूद असलेल्या मालकांकडून कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमूद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मौजे-नालधे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे-आर-पॉ	आकार रुपये	आकार पैसे
मेघा माधव सुगवेकर निखील माधव सुगवेकर	५	३२	०-४२-०	०	४२

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता- मु.पो. कशेळे
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी
दवाखान्यासमोर, ता. कर्जत
जि. रायगड ४१०२०१

सही/-
ॲड. भुपेश तानाजी पेमारे
दिनांक : १४/११/२०२४
मो.नं. ९१५८२७७७२८

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णनाच्या मिळकतीतील खाली नमूद मिळकतीचे विद्यमान मालकांकडून सर्व हक्कांगासह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत.

मिळकतीचे वर्णन

मौजे	सिटी सर्व्हे नं	एकूण क्षेत्र (चौ. मीटर)	सत्ताप्रकार	मालकांची नावे
१) अलिबाग ता.अलिबाग	९६१	२७७.५९	सी	१) नित्यानंद माधव कामत २) राम माधव कामत ३) लक्ष्मण माधव कामत ४) विना श्रीनिवास राव
२) अलिबाग ता.अलिबाग	९६१/२	१८.४०	ए	५) राधिका रामचंद्र किणी ६) शांता राया कामत ७) अनुराधा राया कामत ८) प्रिया राया कामत

सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तीने आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकती निर्वेध आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख : १३/११/२०२४ — **(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता- श्रृती सारंग को.ऑप.हौ.सो. ए विंग
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राह्मण आळी
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक सुनिल तुकाराम सावंत यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

मौजे- नागेवाडी तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत

भूमापन क्र. व उपविभाग/ सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर	क्षेत्र (हे. आर. पॉ)	आकार (रु.पै.)
५०/१४	एकुण क्षेत्र ०-२६-०० हे.आर.पॉ.	०-१९

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास इरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक १४/११/२०२४ — **ॲड. निलेश कान्हू मोरे** मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर.
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमूद असलेल्या मालकांकडून कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमूद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमूद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकतीच्या मालकानं बरोबर आपला खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन :-

मौजे-तमनाथ, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत

सर्वे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.	क्षेत्र आर.	क्षेत्र पॉ.	आकार रुपये	आकार पैसे
६०	५/अ	०	६३	८०	३	०६
६०	७	०	२१	५०	०	६१

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४
चौथा मजला, गणेश अपार्टमेंट
कर्जत नगरपालिका कार्यालय शेजारी
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
ई मेल :- adv.nileshmundhe029@gmail.com

सही/-
ॲड. निलेश दामु मुंढे
दिनांक : १४/११/२०२४
मो.नं. ८४४६८६९६७१

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे म्हात्रोळी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली जमिन मिळकत, माझे अशिल श्री. जयंत गिरधारीलाल पताडिया, राहणार पंचवटी क्रॉस रोड, अहमदाबाद, यांच्या निर्वेध मालकी हक्कात व ताबेकब्जा वहीवाटीत असून, सदरील जमिन मिळकतीची मालकी व ताबा कब्जा विद्यमान कब्जेदार माझे अशिल यांचाच आहे असा भरवसा त्यांनी दिलेला आहे. सदर मिळकतीचा मालकी हक्काचा शोध घेण्याकरिता आणि त्याप्रमाणे Titel Report देण्याकरिता ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील माझे अशिल श्री. जयंत गिरधारीलाल पताडिया यांच्या मालकी हक्काचा तपास करुन मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/ संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा मालकी हक्क बाबतचा दाखला (Titel Certificate) माझे अशिलांना देण्यात येईल व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर)	आकार (रु. पैसे)
म्हात्रोळी, ता. अलिबाग.	१११/२	०-३६-०९ पो. ख. ०-०४-४१ एकूण ०-४०-५०	०२-५०

अलिबाग,
दिनांक १३/११/२०२४

सही/
(ॲड. महेश प्रभाकर वेंगुर्लेकर)
कृष्णवंदन २, तळमजला
कन्या शाळेसमोर, ब्राम्हण आळी,
ता. अलिबाग, जि. रायगड.

भारत को-ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि.
(बहु-उद्देशीय अनुसूचीत बँक)
सेंट्रल कार्यालय : मारूतागिरी, प्लॉट क्र. १३/९ए, सोनावाला रोड, गोरेगाव (पूर्व),
मुंबई ४०० ०६३. दू. ६१८९०१३४/६१८९००८३

ताबा सूचना

ज्याअर्थी,
मी अधोहस्ताक्षरीत भारत को-ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि. यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अनुसार व सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ सहवाचिता अनुच्छेद १३ (१२) अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये कर्जदार यांना निर्देशित रक्कमेचे एकत्रित रक्कमेचे प्रदान सदर सूचनेच्या स्विकृती तारखेपासून ६० दिवसांच्या आत भरणा करण्याकरिता मागणी सूचना जारी केली होती.
सदर कर्जदारांनी सदर रकमेचा भरणा करण्यास कसूर केली असल्याने, सदर सूचना कर्जदार व आम जनतेस देण्यात येत आहे की, अधोहस्ताक्षरितांनी सदर कायद्याच्या अनुच्छेद १३ (४) अंतर्गत व सदर नियमाच्या सहवाचिता नियम ८ अंतर्गत त्यांना प्राप्त अधिकारान्वये खालील निर्देशित मालमत्तेचा **दि. १२ नोव्हेंबर, २०२४ रोजी** ताबा घेतला आहे.
विशेषत: कर्जदार व आम जनतेस इशारा देण्यात येत आहे की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात व्यवहार करू नये व असे कोणतेही व्यवहार हे सदर मालमत्तेसह बँकेच्या प्रभारा अंतर्गत रक्कम भारत को-ऑप. बँक (मुंबई) लि. व त्यावरील सर्व अन्य रक्कम यांच्यासह रकमेच्या अधीन असेल.

अनु. क्र.	कर्जदार यांचे नाव	मागणी सूचना दिनांक व रक्कम	मालमत्ता विवरण
१.	प्रमुख कर्जदार : श्री. राकेश त्रिभुवन वर्मा संयुक्त/ सह-कर्जदार : श्रीम. सविता राकेश वर्मा गृह कर्ज खाते क्र. ००९९३३३३०००३०१	१०.०६.२०२४ रु. २२,१७,१४२/- पुढील व्याजासह सदर	फ्लॅट क्र. ३०२, मोजमापित ३४.०४ चौ. मीटर चटई क्षेत्रफळ अधिक ५.८५ चौ. मीटर चटई डब्ल्यू/एस, एफ/बी बाल्कनी क्षेत्र, बिल्डींग क्र. ए२, ३ रा मजला, बिल्डींग नंदादिप रेसिडन्सी, जमिन धारक सर्व्हे क्र. ३, हिसा क्र. १बी, सर्व्हे क्र. ४, हिस्सा क्र. ४ए२, सर्व्हे क्र. ४, हिस क्र. ४बी, सर्व्हे क्र. ८१, हिस्सा क्र. १बी, गाव वडवली तर्फे वरेडी नोंदणीकरण उप जिल्हा कर्जत नोंदणीकरण जिल्हा रायगड, तालूका कर्जत, जिल्हा रायगड व तालूका कर्जत, जिल्हा रायगड ४१० २०१ येथील मालमत्ता राकेश त्रिभुवन वर्मा व श्रीम. सविता राकेश वर्मा यांच्याद्वारे मालकीची आहे.
२.	प्रमुख कर्जदार : श्री. राजेश मनोहर मोटवानी, संयुक्त/ सह-कर्जदार : श्रीम. नियती राजेश मोटवानी गृह शोभा कर्ज खाते क्र. ०००३३३३७००६६१७५	२१.०६.२०२४ रु. ८,१७,०१०/- सदर त्यावरील पुढील व्याज यांच्यासह	फ्लॅट क्र. ३, मोजमापित २१९ चौ. फूट चटई क्षेत्रफळ, तळ मजला, समृद्धी कॉम्प्लेक्स बी१-बी५ को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लि., बिल्डींग क्र. बी१ (८३), भिवपूरी रेल्वे स्टेशन समोर, कर्जत ४०१ २०१ जिल्हा रायगड येथील नोंदणीकरण जिल्हा, तालूका कर्जत येथील सर्व्हे क्र. ६३, हिससा क्र. २ए, बी, सी, डी, ई व ५, सर्व्हे क्र. ६४ व उप जिल्हा भिवपूरी, गाव गारपोळी रायगड जिल्हा परिषद मर्यादेतील व कर्जत पंचायत समिती येथील मालमत्ता श्री. राजेश मनोहर मोटवानी व श्रीम. नियती राजेश मोटवानी यांच्या मालकीची आहे.
३.	प्रमुख कर्जदार : श्री. विनोद एकनाथ गायकवाड, संयुक्त/ सह-कर्जदार : १. श्री. एकनाथ विष्णू गायकवाड, २. श्री. विकास एकनाथ गायकवाड, ३. श्री. प्रशांत एकनाथ गायकवाड, ४. श्री. विशाल एकनाथ गायकवाड गृह कर्ज खाते क्र. ००१४३३३१००६६११	२१.०६.२०२४ अनुसार रु. २४,०४,५२७/- त्यावरील पुढील व्याज यांच्यासह	फ्लॅट क्र. जी-५, मोजमापित ३१.२६ चौ. मीटर चटई क्षेत्रफळ बिल्डींग क्र. २, ई विंग, तळ मजला, मोरया गार्डन रेसिडन्सी को-ऑप. हा. सो. लि., गाव उसरली (खुर्द) व विचुंबे, तालूका पनवेल, जिल्हा रायगड ४१० २०६ महाराष्ट्र राज्य भारत येथील गट क्र. उसरली (खुर्द), गाव (३१)१, (३१)२, ३२, ३३, (३४)२, ३५, ३७, ३८ व गट क्र. विचुंबे गाव २३६, ९४(१), ९४(२-बी), ९४(२-सी), ९५, ९६, ९७(१), ९७(२), ९८, ९९, १०२(१), १०२(२), १०२(२), १०२(३), १०३, १०५(२), १०७ ही मालमत्ता श्री. विनोद एकनाथ गायकवाड, श्री. एकनाथ विष्णू गायकवाड, श्री. विकास एकनाथ गायकवाड, श्री. प्रशांत एकनाथ गायकवाड व श्री. विशाल एकनाथ गायकवाड यांच्याद्वारे मालकीची आहे.

दिनांक : १२.११.२०२४
ठिकाण : कर्जत, पनवेल

सही/-
प्राधिकृत अधिकारी

Public Notice

Notice is hereby given on behalf of and on the instructions of Maestro Logistics Private Limited, having office at Unit No. 303 & 304, Raheja Plaza, Shah Industrial Estate Area, Off Veera Desai Road, Andheri (West), Mumbai, Maharashtra, India-400053 ("Owner") being the owner of land bearing Gat No. 193 admeasuring 2 Hectares 18.7 Ares (earlier bearing Gat No. 591 and prior thereto bearing Survey No. 92/281) situated at Village Kihim, Panchayat Samiti Alibag, Taluka Alibag, District Raigad, Maharashtra, and more particularly described in the Schedule 1 hereunder written ("said Property") that the original documents pertaining to the said Property as set out in the Schedule 2 hereunder written ("Original Documents") are lost and/or misplaced and not traceable in the records of the Owner. The Owner has, in relation to such missing Original Documents, Going to lodge a police complaint with Alibag police station for Following missing Documents. Dated 15/04/1969 and 07/08/1986.

The Owner further has confirmed that none of the Original Documents are or were at any given time deposited in the custody / possession of any other person, entity, bank or financial institution including but not limited for the purpose of creating any encumbrance, charge, mortgage or third party rights over the said Property, and that no loan has been has been availed in exchange for the original Documents or as security for the Property.

No person, entity, firm, or institution (corporate or otherwise) should deal with, use or transact in any manner, on the basis of the Original Documents, with respect to the said Property or any portion thereof. Any person, entity, firm, or institution (corporate or otherwise) claiming to be in possession of any of the Original Documents relating to the said Property or being in custody of the Original Documents or finding the Original Documents or having any knowledge thereof or having any claim over such Original Documents or claiming rights basis the same is hereby called upon to contact the undersigned and handover the Original Documents at the earliest and within fourteen (14) days from the date of this notice, after which no claim will be entertained in that behalf and shall be deemed to have been waived and/or abandoned. In the event any person, entity, firm, or institution (corporate or otherwise) misuses the Original Documents, the Owner (and any of its successors-in-interest) shall be constrained to take legal action against such person, entity, firm, or institution (corporate or otherwise).

SCHEDULE 1
(Description of the Schedule Property)

All that piece and parcel of land bearing Survey No. 193 admeasuring 2 Hectares 18 Ares 7 Points (earlier bearing Gat No. 591, prior thereto bearing Survey No. 92/2B1 and earlier forming part of Survey No. 92/2B), situated at Village Kihim, Gram Panchayat Kihim, and Panchayat Samiti Alibag, Taluka Alibag, District Raigad, Maharashtra and bounded as under:
On or towards the North : Gat No. 30
On or towards the East : Gat No. 194 & 195 (Part)
On or towards the West : Gat No. 36 +33 +324
On or towards the South : Gat No. 324

SCHEDULE 2
(List of Original Documents)

Sr.No.	Document details	Name of Parties to the Document
1.	Sale Deed dated 15 April 1969 pertaining to Survey No. 92/2B (referred to in Mutation Entry No. 4344 dated 25 August 1969).	Vendors: (1) Sridhar Gangadhar Karve, (ii) Parsharam Shridhar Karve, (iii) Vasant Shridhar Karve and (iv) Vinaykumar/ Vijaykumar Shridhar Karve. Purchasers: (i) Bhikaji Mahadev Neman, (ii) Vishnu Bhikaji Neman.
2	Sale Deed dated 7 August 1986 (date reflected as 15 July 1986 in certain documents) pertaining to Survey No. 92/2B1 (referred to in Mutation Entry No. 5185 dated 13 August 1986).	Vendor: Vishnu Bhikaji Neman. Purchaser: Mahmad Yusuf Ahmed.

Alibag

Sd/-
Adv. Machhindra Mhatre
Date-14/11/2024

Mob. No. 9272170009
Email address:

बाजारात पापलेटची आवक वाढली

मुरूड शहर : बऱ्याच दिवसानंतर बुधवारी मासळी खवव्यांची वर्दळ पाहायला मिळली. बुधवारी (दि. १३) मुरूड मार्केटमध्ये ताजी पापलेट मासळी विक्रीस आली होती. जोडीला कोलंबी, छोट्या सुरमई, मांदेली अशी निवडक मासळी असली तरी पापलेटचा रुबाब वेगळाच दिसत होता.

पापलेट जोडीची किंमत ४०० ते ५०० पर्यंत सांगण्यात येत होती. येथील पापलेट मासळी विक्रेती लक्ष्मी पाटील यांनी सांगितले की, खूप दिवसांनी मार्केटमध्ये मोठ्या आकारातील पापलेट उपलब्ध झाली आहे. कोलंबीदेखील आल्याने खवयांची खूप दिवसांनी चंगळ झाली आहे.

दीपिकाच्या गोलमुळे भारताचा विजय

दक्षिण कोरियावर ३-२ ने मात

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

गतविजेत्या भारतीय महिला हॉकी संघाने मंगळवारी (११ नोव्हेंबर) दक्षिण कोरियन संघावर ३-२ असा रोमहर्षक विजय साकारला. लढत संपायला तीन मिनिटे बाकी असताना दीपिकाने शानदार गोल करीत भारताला विजय मिळवून दिला. सलग दुसऱ्या विजयासह भारतीय महिला हॉकी संघाने गुणतालिकेत सहा गुणांसह दुसरे स्थान पटकावले. संगीताकुमारीने एक, तर दीपिकाने दोन गोल करीत भारताचा विजय निश्चित केला. आशियाई चॅम्पियन्स हॉकी करंडकात चीनचा संघ दोन विजय अन् सहा गुणांसह सरस गोलफरकाच्या जोरावर पहिल्या स्थानावर विराजमान आहे.

भारतीय महिला संघाने पहिल्या क्वार्टरमध्ये सुरुवातीलाच महत्त्वपूर्ण आघाडी मिळवली. नेहाने मधल्या टप्प्यामधून चेंडू पुढे नेला. नवनीत कौरने त्या चेंडूचा ताबा मिळवला. तिने त्वरित हा चेंडू संगीताकुमारीकडे सोपवला. संगीताकुमारीने दक्षिण कोरियाची गोलरक्षक किम युंजी हिचे आव्हान परतवून लावले. भारताचा पहिला गोल झाला. पहिल्या क्वार्टरमध्ये भारतीयांकडून गोल करण्याचे आणखीन प्रयत्न करण्यात आले; मात्र दक्षिण कोरियन हॉकीपटूंकडून अभेद्य बचाव करण्यात आला.

दुसऱ्या क्वार्टरमध्ये दक्षिण कोरियाच्या हॉकीपटूंकडून आक्रमण करण्यात आले. भारतीय संघाच्या क्षेत्रामध्ये त्यांनी प्रवेश केला, पण त्यांना गोल काही करता आला नाही; मात्र २० व्या मिनिटाला सुनेलिता टोप्पो हिने दक्षिण कोरियाच्या हॉकीपटूंकडून चेंडू घेत आपल्याकडे ताबा मिळवला. ब्युटी डुंगडुंग हिने त्यानंतर चेंडू आपल्याकडे घेतला. तिने दीपिकाकडे हा चेंडू पास केला. दीपिकाने भारतासाठी दुसरा गोल करीत २-० अशी आघाडी वाढवली.

दक्षिण कोरियन हॉकीपटूंनी तिसऱ्या क्वार्टरमध्ये दमदार खेळ केला. ली युरिम हिने ३४ व्या मिनिटाला गोल करीत भारताची आघाडी २-१ अशी कमी केली. त्यानंतर चार मिनिटांच्या अंतरात चेऑन युनबी हिने दक्षिण कोरियासाठी दुसरा गोल करीत बरोबरी साधली. या क्वार्टरमध्ये भारतीय खेळाडूंना पेनल्टी कॉर्नर मिळाले, पण पेनल्टी कॉर्नरवर त्यांना गोल करता आला नाही.

चौथ्या क्वार्टरमध्ये दोन्ही संघांनी गोल करण्याचा प्रयत्न केला, पण दोन्ही संघांना यश मिळत नव्हते. दीपिकाचा एक प्रयत्न थोडक्यासाठी हुकला होता. अखेर सामना संपायला तीन मिनिटे बाकी असताना दीपिकाने भारताला विजयी गोल करून दिला. तिच्या दमदार गोलमुळे भारताचा विजय निश्चित झाला. दक्षिण कोरियन हॉकीपटूंनी गोल करण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त केली, पण त्यांना बरोबरीचा गोल करता आला नाही. भारतीय महिला हॉकी संघासमोर आता १४ नोव्हेंबरला थायलंडचे आव्हान असणार आहे. दरम्यान, अन्य लढतींमध्ये चीनने मलेशियावर ५-० असा शानदार विजय साकारला. तर थायलंड व जपान यांच्यामध्ये झालेल्या लढतीमध्ये १-१ अशी बरोबरी झाली आहे.

मुरुडच्या विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत यश

। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।

पेण येथे नुकत्याच झालेल्या जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत मुरुडच्या सुविद्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्तम यश मिळवले. विद्यालयाच्या आर्या उत्तम जैन हिने सतरा वर्षांखालील मुलींच्या गटात प्रथम क्रमांक मिळवून सुवर्ण पदक जिंकले. चौदा वर्षांखालील मुलींच्या गटात खदीजा शमीम हद्दादी हिने व्दितीय क्रमांक, तर चौदा वर्षांखालील मुलांच्या गटात यासिन इब्राहीम मनियार यानेही व्दितीय क्रमांक पटकावला.

या सर्व विद्यार्थ्यांचे सुविद्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका संजिदा खानजादे, विभाग प्रमुख मतीन हमदुले, क्रीडा शिक्षक साहिल अन्सारी, तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन, कौतुक करुन सर्वांना शुभेच्छा दिल्या.

गुकेश १२व्या फेरीअगोदरच विश्वविजेता होईल

ग्रँडमास्टर्स अभिजित कुंटे, प्रवीण ठिपसे यांचा विश्वास



। मुंबई । वृत्तसंस्था।

भारत-ऑस्ट्रेलिया कसोटी मालिकेचे वेध लागलेले असताना बुद्धिबळविश्वात गतविजेता डिंग लिरेन आणि त्याला आव्हान देणारा युवा भारतीय डी. गुकेश यांच्या विश्वविजेतेपदाच्या लढतीची उत्सुकता लागलेली आहे. दोघांचा सध्याचा फॉर्म पाहता १५ फेऱ्यांची ही लढत गुकेश १२व्या फेरीतच जिंकेल, असा विश्वास निष्णांत ग्रँडमास्टर अभिजित कुंटे यांनी व्यक्त केला. तर, १२व्या फेरीच्या आतच गुकेश विश्वविजेता झालेला असेल, असा विश्वास प्रवीण ठिपसे यांनी व्यक्त केला.

स्पोर्ट्स जर्नालिस्ट ऑफ मुंबईच्या वतीने गुकेश आणि लिरेन यांच्यात होत असलेल्या विश्व अजिंक्यपद लढतीसंदर्भात भाष्य करणारा कार्यक्रम वांद्रे येथील एम आयजी क्लब येथे आयोजित केला होता. बुद्धिबळ ऑलिंपियाडमध्ये विजेतेपद मिळवणाऱ्या महिला संघाचे प्रशिक्षक अभिजित कुंटे आणि प्रवीण ठिपसे यांनी या अंतिम सामन्या अगोदरचे दोन्ही प्रतिस्पर्ध्यांच्या लढतीचे भाकीत व्यक्त केले. चीनचा डिंग लिरेन हा अनुभवी खेळाडू असला आणि गुकेश १७ वर्षीय असला तरी बुद्धिबळ विश्वात गुकेशच्या विजयाचा अंदाज व्यक्त केला जात आहे. विश्वविजेतेपदाची ही लढत सिंगापूर येथे २५ नोव्हेंबर ते १३ डिसेंबर या कालावधीत होत आहे. १५ फेऱ्यांची ही लढत आहे; परंतु सध्याचा फॉर्म पाहता गुकेशला अंतिम फेरीपर्यंत वाट पाहावी लागणार नाही, असेच कुंटे आणि ठिपसे यांनी ठामपणे सांगितले. विश्वअजिंक्यपद स्पर्धेचा गेल्या काही वर्षांचा इतिहास पाहिला तर पहिल्यांदा अंतिम सामन्यात खेळत असलेला खेळाडू जिंकलेला आहे. गुकेश प्रथमच ही लढत खेळणार आहे. त्यामुळे इतिहासही गुकेशच्या बाजूने असल्याचे कुंटे म्हणाले.

मुनाफ पटेल दिल्ली कॅपिटल्सचा बॉलिंग कोच

। दिल्ली । वृत्तसंस्था ।

आयपीएल १८ व्या मोसमाआधी मेगा ऑक्शन पार पडणार आहे. या मेगा ऑक्शकडे रिलीज करण्यात आलेल्या खेळाडूंसह क्रिकेट चाहत्यांचं लक्ष लागून आहे. हा मेगा ऑक्शन २४ आणि २५ नोव्हेंबरला सौदी अरेबिया येथील जेद्दाह येथे होणार आहे. त्याआधी कोणता खेळाडू महागडा ठरणार? कुणाला किती रक्कम मिळणार? अशी चर्चा आता सोशल मीडियावर पाहायला मिळत असताना दिल्ली कॅपिटल्सच्या गोटातून मोठी बातमी समोर आली आहे. दिल्ली कॅपिटल्सने त्यांच्या नव्या गोलंदाजी प्रशिक्षकाची घोषणा केली आहे. २०११ च्या विश्व विजेत्या संघाचा खेळाडू आणि गोलंदाज मुनाफ पटेल याची दिल्ली कॅपिटल्स टीमचा बॉलिंग कोच म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. दिल्ली कॅपिटल्सने एक्स या सोशल मीडिया प्लटफॉर्मवरुन ही माहिती दिली आहे.

दिल्ली कॅपिटल्सकडून कोचिंग स्टाफमध्ये करण्यात आलेला हा तिसरा बदल आहे. याआधी टीम इंडियाचा माजी क्रिकेटर हेमंग बदानी यांची हेड कोच म्हणून नियुक्ती करण्यात आली. बदानी यांची दिल्ली कॅपिटल्समध्ये ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पाँटिंग याच्या जागी नियुक्ती करण्यात आली. तर टीम इंडियाचा माजी फलंदाज वेणुगोपाल राव दिल्ली कॅपिटल्सचा क्रिकेट डायरेक्टर म्हणून जबाबदारी पार पाडणार आहे.

मुनाफ पटेल याला गोलंदाजीचा प्रदीर्घ असा अनुभव आहे. मुनाफ पटेलने आयपीएलमधील ६३ सामन्यांमध्ये ७४ विकेट्स घेतल्या आहेत. टीम इंडियाने २०११ साली महेंद्रसिंह धोनी याच्या नेतृत्वात एकदिवसीय वर्ल्ड कप जिंकला होता. मुनाफ पटेल त्या विश्व विजयी संघाचा सदस्य होता. तसेच मुनाफ पटेल याने टीम इंडियाचं १३ कसोटी, ७० एकदिवसीय आणि ३ टी-२० सामन्यांमध्ये प्रतिनिधित्व केलं आहे. कसोटीमध्ये ३५, वनडेत ८६, टी २० मध्ये ४ विकेट्स घेतल्यात.

चॅम्पियन्स ट्रॉफीआधी निवृत्तीची घोषणा

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

अफगाणिस्तान क्रिकेट टीमने तिसऱ्या आणि अंतिम एकदिवसीय सामन्यात बांगलादेशवर मात करत मालिकाही जिंकली. त्यानंतर अफगाणिस्तानचा माजी कर्णधार आणि स्टार ऑलराऊंडर मोहम्मद नबी याने एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्त होणार असल्याचं जाहीर केलं आहे. आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेनंतर वनडे क्रिकेटला अलविदा करणार असल्याचं नबीने सांगितलं. मी गेल्या वनडे वर्ल्ड कप २०२३ स्पर्धेपासून निवृत्तीबाबत विचार करत असल्याचं नबीने तिसऱ्या सामन्यानंतर स्पष्ट केलं.

अफगाणिस्तानने ही मालिका २-१ ने जिंकली. नबीने या मालिकेतील तिन्ही सामन्यात अप्रतिम कामगिरी केली. नबीला त्याच्या या कामगिरीसाठी मालिकावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं. नबीने पोस्ट मॅच प्रेझेंटेशनदरम्यान निवृत्तीबाबत प्रतिक्रिया दिली. माझ्या डोक्यात गेल्या वर्ल्ड कपपासूनच निवृत्तीचे विचार होते. मात्र, आम्ही चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी पात्र ठरलो. मी त्या स्पर्धेत खेळू शकलो तर बरं होईल, असा विचार माझ्या डोक्यात आला, असं मोहम्मद नबी याने म्हटलं. अफगाणिस्तान भारतात पार पडलेल्या आयसीसी वनडे वर्ल्ड कप २०२३ स्पर्धेत सहाव्या स्थानी राहिला. अफगाणिस्तान यासह आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेसाठी थेट पात्र ठरला. या चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचं आयोजन हे फेब्रुवारी २०२५ मध्ये होणार आहे. या स्पर्धेत एकूण ८ संघ सहभागी होणार आहेत.मोहम्मद नबी याने १६७ एकदिवसीय सामन्यांमध्ये अफगाणिस्तानचं प्रतिनिधित्व केलं आहे. तसेच नबीने काही सामन्यांमध्ये अफगाणिस्तानच्या नेतृत्वाची धुराही सांभाळली आहे. मोहम्मद नबी याने १६७ एकदिवसीय सामन्यांमधील १४७ डावांमध्ये २ शतकं आणि १७ अर्धशतकांसह ३ हजार ६०० धावा केल्या आहेत. तसेच नबीने १६१ डावांमध्ये १७२ विकेट्सही घेतल्या आहेत.

पाल्हे कबड्डी स्पर्धेत मरीदेवी धेरंडची बाजी

। पाली/गोमाशी । वार्ताहर ।

श्री वनदेव क्रीडा मंडळ व जय भवानी मित्र मंडळ पाल्हे यांच्यावतीने जिल्हास्तरीय भव्य कबड्डी स्पर्धाचे आयोजन मंगळवार, १२ रोजी कार्तिकी एकादशीनिमित्त करण्यात आले होते. या स्पर्धेत जिल्ह्यातील नामवंत संघाने आपला प्रवेश नोंदविला होता. या वर्षातील कबड्डी स्पर्धेच्या हंगामाचा प्रारंभ झाल्यामुळे क्रीडाप्रेमींनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. या स्पर्धेतील अंतिम लढत मरीदेवी धेरंड जय विरुद्ध श्री गणेश दिवलांग या संघात झाली. या लढतीत मरीदेवी धेरंड हा प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला. या संघास रोख रक्कम २१ हजार रुपये व आकर्षक चषक, तर द्वितीय क्रमांक श्री गणेश दिवलांग या संघास रोख रक्कम १५ हजार रुपये व आकर्षक चषक देण्यात आला. तृतीय क्रमांकांचा मानकरी नूतन हनुमान ढवर, चतुर्थ क्रमांकाचा मानकरी पाडबादेवी रायवाडी या दोन्ही संघास प्रत्येकी १० हजार रुपये व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. सर्वोत्कृष्ट खेळाडू ऋतिक पाटील (धेरंड), उत्कृष्ट चढाई समाधान मोरे (रायवाडी), तर उत्कृष्ट पक्कड श्रेयस पाटील (ढवर), पब्लिक हिरो प्रतिक धुमाळ (दिवलांग) या खेळाडूंना मंडळाच्यावतीने आकर्षक बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले.

कबड्डी स्पर्धेला प्रारंभ, प्रेक्षकांची प्रचंड गर्दी

कराटे स्पर्धेत दर्पणला सुवर्णपदक

। अलिबाग । वार्ताहर ।

नुकत्याच झालेल्या पेण तालुका क्रीडा संकुलमध्ये जिल्हास्तरीय शालेय कराटे स्पर्धेत सांबरी गावाचा सुपुत्र दर्पण नितीन पाटील याने १४ वर्ष आणि ६० किलोवरील वजन गटामध्ये सुवर्णपदक पटकावले. दर्पण हा चिंतामणी केळकर शाळेत इयत्ता नववीत शिकत आहे.

तो कराटे क्लाससाठी संतोष कवळे यांच्या मार्गदर्शनाखाली गणेश मंदिर ब्राह्मण आळी अलिबाग येथे शिकत आहे. दर्पणने सुवर्ण कामगिरी केल्यामुळे सांबरी गावाचे सामाजिक कार्यकर्ते आणि महाशिवरात्री सांबरी गावाच्या मंडळाचे अध्यक्ष सुभाष शेळके महाराज तसेच मंडळाचे कार्यकर्ते सुधीर शेळके, रवींद्र शेळके, सुजन गजमले आणि मित्रमंडळी यांनी दर्पणला फोन करून शुभेच्छा दिल्या. तसेच दर्पणने यश संपादन केले त्याचा श्रेय त्याचे वडील नितीन गोमा पाटील व आई अंजनी पाटील तसेच कराटे मुख्य प्रशिक्षक आणि जिल्हा संघटनेचे सचिव संतोष रामचंद्र कवळे नवगाव यांना जाते, असे सुवर्णपदक विजेता दर्पण पाटील याने सांगितले. तसेच रोहन गुरव रामनाथ अलिबाग आणि जिग्नेश कोळी अलिबाग कोळीवाडा यांचे मार्गदर्शन लाभल्याचे सांगितले.

पनवेलच्या मुलींची बॉक्सिंगमध्ये चमकदार कामगिरी

। पनवेल । वार्ताहर ।

नुकत्याच पार पडलेल्या भुसावळ येथील ऑल इंडिया राणी लक्ष्मीबाई महिला बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये पनवेलच्या मुलींनी चमकदार कामगिरी केली आहे.

भुसावळ येथे पार पडलेल्या ऑल इडिया राणी लक्ष्मीबाई महिला बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये पनवेलच्या मुलींनी एकूण चार महिला बॉक्सर्सने सहभाग घेतला. त्यात २ सुवर्ण व २ रौप्यपदकांची कमाई केली. यामध्ये पनवेलची उन्नती परदेशी (युथ, ५४-५७) मध्ये सुवर्णपदक, खारघरची सई कारंडे (कॉडेट, ४६-४८) मध्ये सुवर्णपदक, नवीन पनवेलची किरण चव्हाण (एलिट, ५२-५४) रौप्यपदक व पनवेलची अस्मी ठाकरे (कॉडेट, ४८-५०) मध्ये रौप्यपदक पटकाविले आहे. या स्पर्धेचे आयोजन माजी राष्ट्रीय विजेते बॉक्सर व सध्याचे प्रशिक्षक नरेंद्र मोरे व माजी राष्ट्रीय खेळाडू व मुंबईचे प्रशिक्षक कृष्ण सोनी यांनी केले. स्पर्धेचे उद्घाटन विश्व विजेती व ऑलिम्पिक पदक प्राप्त भारताची शान मेरी कॉम यांनी केले.

ट्रिसा जॉली-गायत्री गोपीचंद यांचे आव्हान पहिल्याच फेरीत संपुष्टात

।कुमामोटो (जपान)। वृत्तसंस्था ।

भारतीय महिला बॅडमिंटनपटू ट्रिसा जॉली व गायत्री गोपीचंद यांना कुमामोटो मास्टर्स जपान या बॅडमिंटन स्पर्धेमध्ये पहिल्याच फेरीत पराभवाच्या नामुष्कीचा सामना करावा लागला. चीन तैपईच्या ह्यू यिन हुई-लिन यिन हुई या जोडीकडून त्यांचा पराभव झाला. आता या स्पर्धेमध्ये भारताची मदार एकेरी विभागातील लढतींमध्ये लक्ष्य सेन व पी. व्ही. सिंधू या दोन खेळाडूंवर असणार आहे.

जागतिक क्रमवारीत २४ व्या स्थानावर असलेल्या ह्यू यिन हुई-लिन यिन हुई या जोडीने जागतिक क्रमवारीत २० व्या स्थानावर असलेल्या ट्रिसा जॉली-गायत्री गोपीचंद या जोडीवर सरळ दोन गेममध्ये मात केली. चीन तैपईच्या जोडीने पहिला गेम २१-१६ असा जिंकत आघाडी मिळवली.

दुसऱ्या गेममध्येही भारतीय जोडीला पुनरागमन करता आले नाही. प्रतिस्पर्ध्यांनी या गेममध्येही २१-१६ असा विजय मिळवला. चीन तैपईच्या जोडीने ३६ मिनिटांमध्ये भारतीय जोडीला पराभूत केले.

ह्यू यिन हुई-लिन यिन हुई या जोडीने ट्रिसा जॉली-गायत्री गोपीचंद या जोडीला पहिल्यांदाच नमवले; मात्र एकमेकांविरुद्धच्या कामगिरीवर नजर टाकता या पराभवानंतरही भारतीय जोडीचे पारडे जड आहे. कारण ट्रिसा जॉली-गायत्री गोपीचंद या जोडीकडे २-१ अशी आघाडी आहे.

आशू मलिकचे सर्वाधिक १७ गुण

पुणेरी पलटण-दबंग दिल्ली लढत सुटली बरोबरीत

। नोएडा । वृत्तसंस्था ।

कर्णधार अस्लम इनामदारच्या गैरहजेरीत चढाईच्या आघाडीवर अपयशी ठरलेल्या पुणेरी पलटणला प्रो-कबड्डीच्या ११व्या पर्वात मंगळवारी दबंग दिल्लीवर १२ गुणांची आघाडी टिकवता आली नाही. आशू मलिकच्या तुफानी चढायांनी एकवेळ भक्कम असलेला पुणेरी पलटणचा बचावही फिका पडला आणि सामना नाट्यमय कलाटणी घेत ३८-३८ असा बरोबरीत राहिला. पायाच्या दुखापतीमुळे अस्लम इनामदार उर्वरित लीगमध्ये खेळू शकणार नाही. याचा फटका पुणेरी पलटणला निश्चित बसला.

आकाश शिंदेने ८ आणि मोहित गोयतने ६ गुण मिळवत चढाईत चमक दाखवली खरी, पण ते आशूचा झंझावात रोखू शकले नाही. पुणेरी पलटणने बचावाच्या आघाडीवर एकवेळ बाजी मारली होती. पण, अखेरच्या टप्प्यात दडपणाखाली आशू आणि मोहितने त्यांनाही आव्हान दिले होते.

त्यामुळे अमनने हाय फाईव्हसह मिळविलेले ६ आणि गौरव खत्रीचे ४ गुण पुणेरी पलटणचा विजय साकार करू शकले नाहीत. सामन्याचे विशेष म्हणजे दिल्लीचा कर्णधार आणू मलिक आणि बचावपटू गौरव चिल्लर यांनी यंदाच्या हंगामातील अनुक्रमे चढाई आणि बचावातील गुणांचे शतक पूर्ण केले. उत्तरार्धात खेळ सुरु झाल्यावर सुरुवातीची १० मिनिटे कमालीची वेगवान झाली.

प्रथम दबंग दिल्लीने पुणेरी पलटणवर लोण चढवत पिछाडी २१-१३ वरून २२-१८ अशी भरून काढण्याचा प्रयत्न केला. पण, याचा पुणेरी पलटणच्या खेळावर काही परिणाम झाला नाही. त्यांची आघाडी कायमच राहिली. उलट पूर्वार्धात फिके पडलेले आकाश शिंदे आणि मोहित गोयत या चढाईपटूंच्या जोरावर त्यांनी पाच मिनिटांत दिल्लीवर दुसरा लोण देत आपली आघाडी भक्कम केली. त्यानंतर अखेरच्या १० मिनिटांच्या खेळात दबंग दिल्लीच्या आशु मलिक आणि मोहित यांच्या चढायांबरोबरच गौरव चिल्लरच्या भक्कम बचावामुळे दिल्लीने पुणेरी पलटणवर इतका दबाव आणला की ३५-२४ अशी पिछाडी भरून काढत त्यांनी सामना अनपेक्षितपणे ३८-३८ असा बरोबरीत सोडवला. यामध्ये आशु मलिकचा वाटा मोठा होता.

गंभीरने पॉटींगला झापलं!

नवी दिल्ली : भारतीय क्रिकेट संघाचा प्रशिक्षक गौतम गंभीरने ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पॉटींगला चांगलेच झापले आहे. विराट कोहली आणि रोहित शर्माच्या सध्याच्या फॉर्मबद्दल पॉटींगने केलेल्या विधानावरुन गंभीर खवळल्याचं दिसून आलं आहे. गंभीरने खोचक प्रतिक्रिया नोंदवताना पॉटींगला तू भारतीय क्रिकेटमध्ये एवढा रस का घेत आहे, असा प्रश्न विचारला आहे. ऑस्ट्रेलियात खेळवल्या जाणाऱ्या बॉर्डर गावसकर चषकातील ५ कसोटी सामने खेळण्यासाठी भारतीय संघ रवाना होण्यापूर्वी मुंबईमध्ये आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये गंभीरने पॉटींगवर निशाणा साधला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)